Shahada Taluka Educational Society & Co-Operative Educational Society Ltd.

# Institute of Management Research and Development

Shahada Dist- Nandurbar

Asst.Prof. Anil R. Patil
(M.Sc.,M.B.A.)
**Director**
Mo.9423435038

Shri. Motilal F. Patil
(M.Sc., Agri.)
**Chairman**

College Phone
02565-223122, 223532
**College Code: - 230102**

Website-www.stcimrd.ac.in

E-Mail:-stcoopimrdshahada@gmail.com

**Date: 12/09/2023**

To

Whomever it may Concern

NAAC

**Subject:** Regarding circular of activities

**Reference:** Your query No: 5.3.2 Point. No. 1 in DVV

Respected Sir/Madam,

With mentioned above subject we would like to inform you that, in our institute we inform to student through notice instead of circular or brochure for different activity programs.

S.T.E.S. & Co-Op.E.S.Ltd. IMRD Shahada

DIRECTOR
S.T.E.S. & Co-Op.Edu. Society Ltd.
Institute of Management
Research & Development
Shahada, Dist. Nandurbar

**Shahada Taluka Educational Society & Co-Operative Educational Society Ltd.**

# Institute of Management Research and Development

Shahada Dist- Nandurbar

**Asst.Prof. Anil R. Patil**
**(M.Sc.,M.B.A.)**
**Director**
**Mo.9423435038**

College Phone
02565-223122, 223532
**College Code: - 230102**

**Shri. Motilal F. Patil**
(M.Sc., Agri.)
**Chairman**

Website-www.stcimrd.ac.in

E-Mail:- stcoopimrdshahada@gmail.com

Date:-22-01-2023

## NOTICE

All the Teachers/students are here by informed that, **Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon and Dhanaji Nana College, Faizpur** will be organizing the following program as per the given schedule.

We request the presence of all teachers and students for this important event. Your attendance is expected to be on time to ensure the smooth running of the program.

**Program Details**

| | |
|---|---|
| Name of Program | : - Yuvarang – 2022 |
| Date | : - 9 – 13 Feb 2023 |
| Venue | : - Dhanaji Nana College, Faizpur |

S.T.E.S. & Co-Op.E.S.Ltd. IMRD Shahada

DIRECTOR
S.T.E.S. & Co-Op.Edu. Society Ltd.
Institute of Management
Research & Development
Shahada, Dist. Nandurbar

**विद्यार्थी विकास विभाग**

जा.क्र. कबचौउमवि/१४/युम-३३/ **१५** /२०२३ दि.२३/०१/२०२३

**<u>सुधारीत परिपत्रक</u>**

# आंतर महाविद्यालय युवक महोत्सव युवारंग २०२२

प्रति,

१) मा.प्राचार्य / मा. संचालक / विभाग प्रमुख,
विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालये / मान्यता प्राप्त परिसंस्था

२) मा.संचालक / विभाग प्रमुख, विद्यापीठ शैक्षणिक प्रशाळा-विभाग यांना..

**विषय :- आंतर महाविद्यालयीन युवक महोत्सव युवारंग २०२२ बाबत....**

महोदय / महोदया,

विद्यापीठ प्राधिकरण धोरणानुसार विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगती बरोबरच त्यांच्या व्यक्तिगत सुप्त कला गुणांचा विकास व्हावा आणि कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ परिक्षेत्रातून प्रतिभावंत-कलावंत घडावेत, तसेच विद्यार्थ्यांना **सांस्कृतिक मूल्यांची जाण व्हावी असा मनोदय मा. कुलगुरु महोदय प्रा. व्ही.एल. माहेश्वरी यांचा असतो.** यासाठी प्राथमिक स्तरावर विद्यार्थ्यांना व्यासपीठ मिळण्याकरीता दरवर्षी युवक महोत्सवाचे आयोजन करण्यात येत असते.

या अनुषंगाने विद्यापीठ संलग्न महाविद्यालये, मान्यताप्राप्त परिसंस्था व शैक्षणिक प्रशाळा-विभागातील नियमित विद्यार्थ्यांसाठी आंतर महाविद्यालयीन युवक महोत्सवाचे आयोजन विद्यार्थी विकास विभाग, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव व **<u>धनाजी नाना महाविद्यालय, फैजपूर, ता. यावल, जि. जळगाव</u>** यांच्या संयुक्त विद्यमाने **दि. ९ ते १३ फेब्रुवारी, २०२३** या कालावधी मध्ये **स्वातंत्र्यांचा अमृत महोत्सव या विशेष संकल्पनेवर** करण्यात येत आहे.

आपणास कळविण्यात येते की, आंतर महाविद्यालयीन युवक महोत्सवामध्ये विविध कला प्रकारात आपले विद्यार्थी जास्तीत-जास्त संख्येने सहभागी होण्याकरीता प्रयत्न करावेत. युवक महोत्सवात सहभागी होणाऱ्या स्पर्धकांना व कला मंडळाच्या प्रमुखांना या परिपत्रकासोबत दिलेली स्पर्धा नियमावली व माहिती निर्देशनास आणून द्यावी. आपल्या तज्ञ प्राध्यापकांच्या सहकार्याने स्पर्धकांची चांगली तयारी करुन स्पर्धेतील विविध कला प्रकारांमध्ये आपला संघ **<u>सहभागी होणे अनिवार्य आहे.</u>**

**युवक महोत्सव नियमावली व माहितीपत्रकासंदर्भात विद्यापीठाच्या वेबसाईटवर भेट द्यावी. विद्यापीठाची वेबसाईट <u>www.nmu.ac.in</u> यावरील <u>Portal Login</u> ला Click करुन युवारंग लिंक दि. २० ते ३१ जानेवारी २०२३ या दरम्यान उपलब्ध असून यात स्पर्धक, साथसंगीतदार आणि संघ व्यवस्थापक यांची माहिती भरणे अनिवार्य आहे. तसेच विविध शुल्क, नोंदणी, प्रवेश, भोजन आदि ई- पेमेंट (NEFT) द्वारे आयोजकांच्या बँक खाती जमा करावेत, सदर बँक खात्याचा तपशिल पेज क्र. ०५ वर नमुद आहे.**

ऑन लाईन नोंदणी झाल्यावर महाविद्यालयाने भरलेल्या माहितीची पुष्टी करण्यासाठी verification copy download करुन घ्यावी. महाविद्यालयाकडून भरलेल्या माहितीची पुष्टी झाल्यावर Confirm Application ला click करावे. महाविद्यालयाकडून एकदा Confirmed झालेल्या Application मधील माहितीत पुन्हा बदल करता येणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी. Confirm Application झाल्यावर Download Final Copy of Application ला Click करुन आयोजक महाविद्यालयाला पाठवावयाची संघ नोंदणीची प्रत Download करावी. सदर प्रतीवर विद्यार्थी विकास अधिकारी व मा.प्राचार्य यांची स्वाक्षरी घेऊन **<u>दि. ०६ फेब्रुवारी २०२३, सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत आयोजक महाविद्यालयास सादर करणे अनिवार्य राहील.</u>**

त्याचप्रमाणे सोबत NEFT ची प्रत देखील पाठवावी. विद्यार्थी व संघ व्यवस्थापक यांचा नजीकच्या काळातील एक फोटो System Generated Form वर लावावा. तसेच सर्व System Generated Forms ची छायांकित प्रत व ई-पेमेंट केल्याची एक प्रत संघ व्यवस्थापकांनी आपल्या सोबत ठेवणे आवश्यक आहे.

कळावे,

आयोजक महाविद्यालय संपर्क:-

**डॉ. शंकर विठ्ठल जाधव,**
**समन्वयक, आंतर महाविद्यालयीन युवक महोत्सव युवारंग - २०२२**
**धनाजी नाना महाविद्यालय, फैजपूर, ता. यावल, जि. जळगाव**
**भ्र.क्रमांक - ८३२९९१८८४३२, इमेल आयडी -** drsvjadhav@gmail.com

**डॉ. राकेश दयाराम तळेले,**
**सहसमन्वयक, आंतर महाविद्यालयीन युवक महोत्सव युवारंग - २०२२**
**धनाजी नाना महाविद्यालय, फैजपूर, ता. यावल, जि. जळगाव**
**भ्र.क्रमांक - ९९७५३४६४७७, इमेल आयडी -** rakeshtalele007@gmail.com

आपला विश्वासू,

(प्रा. सुनील बा.कुलकर्णी)
**संचालक, विद्यार्थी विकास (अ.का.)**

**सोबत :-** सूचना, अटी व नियम, प्राचार्यांचे हमीपत्र, गुणतालिका व वेळापत्रक

**प्रत माहितीसाठी -**

1) विभागप्रमुख, कुलगुरु कार्यालय, कबचौउमवि, जळगाव
2) विभागप्रमुख, प्र-कुलगुरु कार्यालय, कबचौउमवि, जळगाव
3) विभागप्रमुख, कुलसचिव, कार्यालय, कबचौउमवि, जळगाव
4) विभागप्रमुख, वित्त विभाग, कबचौउमवि, जळगाव
5) जनसंपर्क अधिकारी, कबचौउमवि, जळगाव - कृपया, सदर पत्रकास वृत्तपत्र, आकाशवाणी, दुरचित्रवाणी व उत्तमविद्याअंकात प्रसिध्दी दयावी.
6) पध्दती विश्लेषक, संगणकशास्त्र प्रशाळा, कबचौउमवि, जळगाव - कृपया, पत्रकास विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्दी दयावी.

**टिप :- Online System शी संबधित माहिती Portal Login मध्ये PDF स्वरुपात उपलब्ध आहे. नोंदणी करण्यास अडचण आल्यास कृपया ०२५७-२२५८४११ या दुरध्वनी क्रमांकावर विद्यापीठ कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा.**

## ♦ आंतर महाविद्यालयीन युवक महोत्सव युवारंग २०२२♦

*** <u>महाविद्यालय, परिसंस्था व शैक्षणिक प्रशाळा-विभाग यांना महत्वाच्या सूचना</u> :-**

१) महाविद्यालयाने संघा सोबत दोन विद्यापीठ **मान्यताप्राप्त** प्राध्यापक संघव्यवस्थापक म्हणून संपूर्ण युवक महोत्सव कालावधीसाठी पाठवावे, त्यामध्ये १ पुरुष व १ महिला असणे आवश्यक आहे. स्पर्धक संख्या ३० किंवा त्यापेक्षा जास्त असल्यास ३ संघ व्यवस्थापक पाठवू शकतात, त्यांनी महाविद्यालयाचे ओळखपत्र बाळगणे आवश्यक राहील.

२) संघ व्यवस्थापकांची सभा महोत्सवाच्या आदल्या दिवशी सायंकाळी ७.३० वाजता कार्यक्रम स्थळी घेण्यात येईल. सभेस संघव्यवस्थापक उपस्थित रहाणे आवश्यक आहे.

३) संघ व्यवस्थापकांनी संघासोबत थांबणे सक्तीचे आहे व त्यांनी आपआपल्या विद्यार्थ्यांसोबत परिसरात जास्तीत-जास्त काळ थांबावे.

४) कोणत्याही कला प्रकारासाठी वादन साहित्य, इतर साहित्य, स्पर्धक संघाने स्वतः आणावयाचे आहे.

५) महोत्सवात सहभागी होणाऱ्या संघाची कला प्रकार निहाय नोंदणी परिपत्रकात नमूद केल्याप्रमाणे करावी. उशिरा आलेल्या संघाची नोंदणी करण्यात येणार नाही, याची संघ व्यवस्थापकांनी नोंद घ्यावी.

६) युवक महोत्सवासाठी विद्यार्थी निवड करतांना सदरचा विद्यार्थी पदवी / पदवीव्युत्तर वर्गात नियमित प्रवेश घेणारा असावा. **पदविका व सहामाही / एक वर्षाच्या प्रमाणपत्र अभ्यासक्रमाला प्रवेशित विद्यार्थ्यांची निवड करु नये.** त्यांचेकडे शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील ओळखपत्र असावे त्यावर मा.प्राचार्य/ संचालक/ विभागप्रमुख/ ग्रंथपाल याची स्वाक्षरी असावी.

७) युवक महोत्सवासाठी निवड झालेला विद्यार्थी हा नियमित प्रवेशित, ओळखपत्रधारक, वय, वयोमर्यादा व त्याची शैक्षणिक अर्हता याबाबत खात्री करुन पात्र विद्यार्थी युवक महोत्सवा मध्ये पाठविण्याची जबाबदारी संघव्यवस्थापक, विद्यार्थी विकास अधिकारी, प्राचार्य/ संचालक/ विभागप्रमुख यांची राहील. याबाबत अनियमितता आढळल्यास मा. कुलगुरु महोदय, मा.विद्यापीठ व्यवस्थापन परिषद व विद्यापीठ विकास मंडळ यांच्या निर्णयानुसार कारवाई करण्यात येईल.

८) कार्यक्रम स्थळी विद्यार्थ्यांनी कोणतेही लिखाण, तोडफोड अथवा घाण करु नये, अशी ताकीद संघ व्यवस्थापकांनी विद्यार्थ्यांना द्यावी. पालन न झाल्यास योग्य ती कारवाई करण्यात येईल.

९) संघ व्यवस्थापकांनी कोणत्याही कारणाने परीक्षकांना भेटू नये. तसेच स्पर्धकांसोबत थांबणे आवश्यक आहे. संघ व्यवस्थापकांनी स्पर्धकास नातेवाईक अथवा मित्र यांच्याकडे जाण्यास परवानगी देऊ नये.

१०) स्पर्धक महाविद्यालयास निश्चित केलेल्या क्रमवारीनुसार सादरीकरण करणे बंधनकारक राहील.

११) संघ व्यवस्थापकांच्या सभेत वक्तृत्व व वादविवाद स्पर्धांचे विषय जाहीर केले जातील.

१२) परीक्षकांचा निर्णय अंतिम राहील व तो सर्वांवर बंधनकारक राहील.

१३) **कला प्रकार सादरीकरणामध्ये अश्लिल शब्दाचा वापर करु नये.** अन्यथा त्या कला प्रकाराचे सादरीकरण त्याच क्षणी रद्द करण्याचा अधिकार परीक्षकांना आहे.

१४) संघ व्यवस्थापकांनी आपल्या महाविद्यालयाचे काही लेटर हेड सोबत ठेवावे. कोणतीही तक्रार लेटर हेड शिवाय स्वीकारली जाणार नाही.

१५) सामुहिक कला प्रकारात संघ मुलांचा अथवा मुलींचा अथवा मुलांमुलींचा असला तरी चालेल.

१६) कोणत्याही स्पर्धकाचे वय दि. ०९ फेब्रुवारी, २०२३ रोजी २७ वर्षा पेक्षा जास्त नसावे याची पडताळणी केल्यावरच स्पर्धकाला महोत्सवात पाठवावे. (सदरचा नियम हा या वर्षापुरताच लागू राहील)

१७) **<u>एका स्पर्धकास जास्तीत-जास्त तीन (३) उपकला प्रकारात सहभागी होता येईल व ललित कला प्रकारातील स्पर्धेत जास्तीत जास्त दोन (२) उपकलाप्रकारात सहभाग घेता येईल.</u>** यापेक्षा जास्तीचा सहभाग आढळून आल्यास त्याचा सर्व कला प्रकारातील सहभाग रद्द करण्यात येईल.

१८) महोत्सव संबंधी कोणताही निर्णय घेण्याचा, कार्यक्रमात बदल करण्याचा अधिकार युवक महोत्सव आयोजन समितीने राखून ठेवला आहे.

१९) स्पर्धकाच्या प्रवेश अर्जावरील छायाचित्र तसेच जन्म तारखेचा दाखला (L.C./T.C.) मा. प्राचार्य/ संचालक / विभाग प्रमुख यांनी साक्षांकीत केलेले असावे. नसल्यास सदर विद्यार्थ्याचा त्या कला प्रकारातील सहभाग रद्द करण्यात येईल.

२०) पार्श्वसंगीतासाठी व्यावसायिक संगीत साथीदारांना परवानगी राहील. त्याकरीता प्रवेशिकेत नमूद करणे आवश्यक राहील.

२१) संलग्न महाविद्यालयाने युवक महोत्सवात सहभाग नोंदविणे क्रमप्राप्त असून त्या करिता युवक महोत्सव शुल्क रु. १०००/- तसेच स्पर्धक व साथसंगतकार विद्यार्थ्याकरीता प्रत्येकी रु. १५०/- शुल्क आकारण्यात येईल. सदरचे शुल्क एकत्रितपणे NEFT द्वारे यजमानांकडे जमा करणे आवश्यक आहे.

२२) आयोजक महाविद्यालयाने स्पर्धक- साथसंगतकार विद्यार्थी, संघ व्यवस्थापक, मार्गदर्शक आदिंची भोजन (दुपार व रात्रीची) व्यवस्था केली असून या व्यवस्थेकरीता प्रती व्यक्ती रु. ८००/- शुल्क आकारण्यात येईल, सदर शुल्क NEFT द्वारे यजमानांकडे जमा करावे.

**२३) प्रत्येक महाविद्यालयाने युवक महोत्सवात सहभागी होणे अनिवार्य आहे. (पाच मुख्य कलाप्रकारातील किमान एका उपकला प्रकारात सहभागी होणे बंधनकारक आहे.) ज्या महाविद्यालयाचा युवक महोत्सवात सहभाग नसेल त्यांच्यावर प्राधिकरणाच्या निर्णयानुसार कडक कारवाई करण्यात येईल, याची महाविद्यालयांनी नोंद घ्यावी.**

२४) एका महाविद्यालयाच्या संघात जास्तीत-जास्त ४२ स्पर्धक विद्यार्थी, ०६ साथसंगतदार व ०२ संघव्यवस्थापक असे एकूण जास्तीत-जास्त ५० व्यक्ती सहभागी असतील.

२५) युवक महोत्सव वेळापत्रकात प्रसंग व आवश्यकतेनुसार वेळोवेळी बदल करण्याचे अधिकार युवक महोत्सव युवारंग २०२२ आयोजन समितीस राहतील.

२६) महाविद्यालयाने युवक महोत्सवात सादर केलेल्या कला प्रकाराची मुळ संहिता वापरण्याविषयी लेखक / कलावंत यांची लेखी संमती घेणे आवश्यक राहील व त्याची प्रमाणित छायांकित प्रत प्रवेशिकेसोबत सादर करणे आणि त्याची एक प्रत संघ व्यवस्थापकाने बाळगणे अनिवार्य राहील.

२७) विजेत्या महाविद्यालयाचे गायनातील गीत, विडंबन नाट्य, मुक नाट्य, लोक संगीत आदी कला प्रकारातील संहिता (स्क्रीप्ट) वेगवेगळ्या स्पर्धामध्ये वापरण्याचा हक्क विद्यापीठाचा राहील.

## * स्पर्धक विद्यार्थ्यांना महत्वाच्या सूचना :-

१) प्रत्येक विद्यार्थ्याने युवक महोत्सव नियमांचे, संघ व्यवस्थापकांच्या सूचनांचे पालन करावे, निवासस्थानी, स्पर्धा परिसरात, प्रत्यक्ष स्पर्धेच्या वेळी शांतता ठेवावी.

२) प्रत्येक स्पर्धकाने आपले ओळखपत्र सोबत ठेवावे. तसेच युवक महोत्सवाचे ओळखपत्र दिसेल अशा ठिकाणी कायम स्वरुपी लावणे आवश्यक आहे.

३) कोणत्याही स्पर्धकाने तक्रारीसाठी संचालक, अध्यक्ष-संयोजन समिती, आयोजन समिती, व्यवस्थापन समिती सदस्यांना परस्पर भेटू नये. तक्रार असल्यास संघ व्यवस्थापकांमार्फत पाठवावी.

४) विद्यार्थ्यांनी रात्री स्पर्धा संपल्यानंतर आपापल्या निवास स्थानाकडे जावे, इतरत्र थांबू नये.

५) स्पर्धकांनी परिसर स्वच्छ ठेवण्यासाठी मदत करावी. आपणच परिसरात राहणार आहोत, याची जाणीव ठेवावी.

६) स्पर्धेच्या ठिकाणी असलेल्या समोरील खुर्च्यांवर स्पर्धकांनी बसू नये.

७) वरील नियमभंग करणाऱ्या विद्यार्थ्यांवर कडक कारवाई करण्यात येईल व त्याचा परीणाम संघाच्या एकूण कामगिरीवर होईल, याची नोंद घ्यावी.

८) युवक महोत्सव युवारंग मध्ये प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक विजेत्यांना पुढील स्पर्धेत सहभागी होणे बंधनकारक राहील.

९) स्पर्धा सुरु असतांना कोणत्याही संघाने ढोल तासे वाजवू नये,घोषणा किंवा इतर संगीत साहित्य वाजवू नये तसे आढळल्यास रु. १,०००/- दंड आकारण्यात येईल.

*** सर्वसाधारण विजेतेपद :-**

युवक महोत्सवात सहभागी सर्व संघांमधून प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाचे सर्व साधारण विजेते म्हणून घोषित करण्यात येईल. सर्वसाधारण विजेतेपदाची निवड करतांना पूढील निकष असतील.

१) संघाचा जास्तीत-जास्त कला प्रकारात सहभाग असणे आवश्यक असेल.
२) संघाने व व्यवस्थापकाने शिस्तीचे पालन, वेळेचे पालन व नियमांचे पालन करणे आवश्यक असेल.
३) संघाने जास्तीत-जास्त स्पर्धांमध्ये पारितोषिकसंख्या प्राप्त करणे आवश्यक असेल.
४) सर्वसाधारण विजेतेपदासाठी गुण विभागणी तक्त्यानुसार गुण दिले जातील.

- सर्व साधारण विजेता करीता **डॉ. जी. डी. बेंडाळे स्मृतीचषक** प्रदान करण्यात येईल. प्रथम क्रमांकाचा चषक हा फिरता राहील, याची नोंद घ्यावी.
- सर्व साधारण उपविजेता करीता **कै. कुसुमताई मधुकरराव चौधरी स्मृतीचषक** प्रदान करण्यात येईल. द्वितीय क्रमांकाचा चषक हा फिरता राहील, याची नोंद घ्यावी.

*** आंतर महाविद्यालयीन युवक महोत्सव २०२२ पारितोषिक स्वरुप :-**

- सर्व सहभागी विद्यार्थी स्पर्धक, संघव्यवस्थापक व महाविद्यालय यांना सहभागाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.
- प्रथम, द्वितीय व तृतीय विजेत्या स्पर्धकांना प्रमाणपत्र, पदक व स्मृतीचिन्ह युवक महोत्सवात प्रदान करण्यात येतील.
- स्पर्धा कला प्रकारातील साथसंगतदार हा विद्यार्थी नसल्यास त्यास पारितोषिकाचा लाभ मिळणार नाही.
- स्पर्धा विजेते स्पर्धक/ संघ यांचेबाबत संबंधितांच्या आक्षेप वैध ठरल्यास त्या कला प्रकारातील प्रदान करण्यात आलेले पदक, प्रमाणपत्र व स्मृतीचिन्ह परत घेण्यात येतील. तसेच संबंधित स्पर्धक व संघ महाविद्यालयावर कारवाई करण्यात येईल.

*** जिल्हानिहाय प्रोत्साहनपर फिरते चषक :-**

- शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून युवक महोत्सव युवारंग मध्ये ज्या महाविद्यालयात विद्यार्थी संख्या, तज्ज्ञ मार्गदर्शक व साधन सामुग्रीचा अभाव असतांना देखील उत्कृष्ट सादरीकरण केले परंतू त्यांना विजेतेपद किंवा उपविजेते पद मिळाले नाही किंवा थोडया फरकाने ते वंचित राहिले अशा महाविद्यालयांना जिल्हानिहाय तीन प्रोत्साहनपर फिरते चषक देण्यात येतील.

  **१)** स्व. वसुधंरा चौधरी यांच्या स्मृति प्रित्यर्थ, प्राचार्य डॉ. अरविंद चौधरी, जामनेर पुरस्कृत फिरता चषक **(जळगाव जिल्हा)**
  **२)** स्व. मातोश्री शांताबाई जगन्नाथ महाजन यांच्या स्मृति प्रित्यर्थ, प्रा. मुक्ता महाजन, जळगाव पुरस्कृत फिरता चषक **(धुळे जिल्हा)**
  **३)** स्व. बाबुराव कुलकर्णी देशगव्हाणकर यांच्या स्मृति प्रित्यर्थ, प्रा. सुनील बाबुराव कुलकर्णी, देशगव्हाणकर पुरस्कृत. फिरता चषक **(नंदुरबार जिल्हा)**

- NEFT द्वारे युवक महोत्सव नोंदणी, प्रवेश आणि अनुषंगिक व्यवस्था शुल्क ई-पध्दतीने भरण्याकरीता आयोजक महाविद्यालयाच्या बँक खात्याचा सविस्तर तपशिल खालीलप्रमाणे -

| आयोजक महाविद्यालयाचे नांव | **धनाजी नाना महाविद्यालय, फैजपूर, ता. यावल, जि. जळगाव** |
|---|---|
| **Account Name** | Principal, Dhanaji Nana Mahavidyalaya |
| **Name of Bank** | Jalgaon Janata Sahakari Bank Ltd. |
| **Branch** | Jalgaon Janata Sahakari Bank Ltd. Branch : Savada, Tal. Yawal, Dist. Jalgaon |
| **Account No.** | 07021000358 |
| **IFS Code** | JJSB0000008 |
| **Account Type** | **Current** |

<u>महाविद्यालयाच्या लेटर हेडवर</u>

# प्राचार्यांचे हमीपत्र

मी, प्राचार्य-------------------------------------------------------- आज दिनांक------------------ - रोजी  हमीपत्र लिहून देतो की, आमच्या -------------------------------------------------- महाविद्यालयाचा संघ कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागाव्दारे आयोजित **आंतर महाविद्यालयीन युवक महोत्सव युवारंग- २०२२** मध्ये विविध कला प्रकारांसह सहभागी होत आहे.

आमच्या महाविद्यालयातील कोणत्याही कला प्रकारातील संघास, विद्यार्थ्यास प्रथम, व्दितीय, तृतीय पारितोषिक प्राप्त झाल्यास व त्यांची विद्यापीठाच्या वतीने राज्यस्तरीय युवक महोत्सव (इंद्रधनुष्य), पश्चिम विभागीय युवक महोत्सव, राष्ट्रीय युवक महोत्सव आणि आंतरराष्ट्रीय युवक महोत्सवात निवड झाल्यास माझ्या महाविद्यालयातील विद्यार्थी / संघ सहभागी होतील व त्यासंदर्भातील विद्यापीठाच्या विहीत अटी व शर्ती माझ्या महाविद्यालयास मान्य असतील. निवड होवूनही माझ्या महाविद्यालयातील विद्यार्थी विद्यापीठाच्या संघात सहभागी न झाल्यास विद्यापीठ अधिकार मंडळाने, विद्यार्थी विकास विभागाव्दारे केलेल्या कार्यवाहीस माझ्या महाविद्यालयाची मान्यता राहील.

विद्यार्थी विकास विभागाव्दारे निर्गमीत संदर्भिय परिपत्रकातील अटी व शर्ती आमच्या महाविद्यालयास मान्य असतील.  सदरचे हमीपत्र लिहून दिले असे.

सही : ---------------------------------------
प्राचार्याचे नाव : ----------------------------
शिक्का :

## ♦ आंतर महाविद्यालयीन युवक महोत्सव युवारंग २०२२ कलाप्रकार अटी व नियम ♦

### १) संगीत (Music)

#### अ) भारतीय शास्त्रीय गायन (Indian Classical Vocal Solo)

१) प्रत्येक महाविद्यालयातून केवळ ०१ (एक) स्पर्धक या स्पर्धेत सहभागी होईल.
२) स्पर्धकास सादरीकरणाकरीता भारतीय/ कर्नाटकी यापैकी कोणत्याही एका शैलीचा वापर करावा लागेल.
३) सादरीकरणाकरीता किमान ०८ (आठ) मिनिटे व कमाल १० (दहा) मिनिटांचा कालावधी देण्यात येईल.
४) मंच तथा वाद्यव्यवस्था करण्याकरीता कमाल ०३ (तीन) मिनिटांचा कालावधी देण्यात येईल. उद्घोषणेनंतर लगेचच सादरीकरणाची वेळ सुरु होईल.
५) सदर कला प्रकाराकरीता कमाल ०२ (दोन) साथीदारांचा वापर करण्यात येईल.
६) राग किंवा रचनेची निवड करीत असतांना स्पर्धकांनी पुरेसा विचार व काळजी घ्यावयाची आहे.
७) यास्पर्धेमध्ये चित्रपटातील गीतांचे सादरीकरण करता येणार नाही.
८) परीक्षकांचा निर्णय ताल, रागाची निवड, रचना आणि प्रभाव यातील गुणवत्तेवर आधारीत राहील.

#### आ) भारतीय शास्त्रीय वाद्य संगीत (तालवाद्य) (Indian Classical Instrumental Solo Percussion)

१) प्रत्येक महाविद्यालयातून केवळ ०१ (एक) स्पर्धक यास्पर्धेत सहभागी होईल.
२) स्पर्धकास सादरीकरणाकरीता भारतीय/ कर्नाटकी यापैकी कोणत्याही एका शैलीचा वापर करावा लागेल.
३) सादरीकरणाकरीता किमान ०८ (आठ) मिनिटे व कमाल १० (दहा) मिनिटांचा कालावधी देण्यात येईल. उद्घोषणेनंतर लगेचच सादरीकरणाची वेळ सुरु होईल.
४) मंच तथा वाद्यव्यवस्था करण्याकरीता कमाल ०३ (तीन) मिनिटांचा कालावधी देण्यात येईल.
५) सदर कला प्रकाराकरीता कमाल ०१ (एक) साथीदारांचा वापर करता येईल.
६) सहभागी स्पर्धकांना कला सादरीकरणाकरीता स्वतःची वाद्ये आणावी लागतील.
७) परीक्षकांचा निर्णय ताल, रागाची निवड, रचना आणि प्रभाव यातील गुणवत्तेवर आधारीत राहील.

#### इ) भारतीय शास्त्रीय वाद्य संगीत (स्वरवाद्य) (Indian Classical Instrumental Solo- Non Percussion)

१) प्रत्येक महाविद्यालयातून केवळ ०१ (एक) स्पर्धक सहभागी होईल.
२) स्पर्धकास सादरीकरणाकरीता भारतीय/ कर्नाटकी यापैकी कोणत्याही एका शैलीचा वापर करावा लागेल.
३) सादरीकरणाकरीता किमान ०८ (आठ) मिनिटे व कमाल १० (दहा) मिनिटांचा कालावधी देण्यात येईल. उद्घोषणेनंतर लगेचच सादरीकरणाची वेळ सुरु होईल.
४) मंच तथा वाद्य व्यवस्था करण्याकरीता कमाल ०३ (तीन) मिनिटांचा कालावधी देण्यात येईल.
५) सदर कला प्रकाराकरीता कमाल ०१ (एक) साथीदारांचा वापर करण्यात येईल.
६) सहभागी स्पर्धकांना कला सादरीकरणाकरीता स्वतःची वाद्ये आणावी लागतील. प्रक्रियक वाद्याचा (सिन्थेसायझर) उपयोग करता येणार नाही.
७) भारतीय राग प्रणालीचा वापर करणारी पाश्चिमात्य उमगाची वाद्ये वापरता येतील.
८) परीक्षकांचा निर्णय स्वर, रागाची निवड, रचना आणि प्रभाव यातील गुणवत्तेवर आधारीत राहील.

#### ई) नाट्यसंगीत (Natyasangeet - Solo Event)

१) प्रत्येक महाविद्यालयातून केवळ ०१ (एक) स्पर्धकास यास्पर्धेत सहभागी होईल.
२) कोणत्याही भारतीय नाटकातील नाट्यपद/ नाट्यगीत प्रकार सादर करता येईल (ओवी व भावगीत सोडून)
३) सादरीकरणाकरीता किमान ०५ (पाच) मिनिटे व कमाल ०७ (सात) मिनिटांचा कालावधी देण्यात येईल. उद्घोषणेनंतर लगेचच सादरीकरणाची वेळ सुरु होईल.
४) मंच तथा वाद्य व्यवस्था करण्याकरीता कमाल ०३ (तीन) मिनिटांचा कालावधी देण्यात येईल.
५) सदर कला प्रकाराकरीता कमाल ०२ (दोन) साथीदारांचा वापर करण्यात येईल.
६) चित्रपटातील नाट्यपदांचे सादरीकरण करता येईल.
७) परीक्षकांचा निर्णय स्वर, रागाची निवड, रचना आणि प्रभाव यातील गुणवत्तेवर आधारीत राहील.

**उ) भारतीय सुगम संगीत (Indian Light Vocal)**

१) प्रत्येक महाविद्यालयातून केवळ ०१ (एक) स्पर्धकास या स्पर्धेत सहभागी होईल.

२) सादरीकरणाकरीता किमान ०४ (चार) मिनिटे व कमाल ०६ (सहा) मिनिटांचा कालावधी देण्यात येईल. उद्घोषणेनंतर लगेचच सादरीकरणाची वेळ सुरु होईल.

३) मंच तथा वाद्य व्यवस्था करण्याकरीता कमाल ०३ (तीन) मिनिटांचा कालावधी देण्यात येईल.

४) सदर कला प्रकाराकरीता कमाल ०२ (दोन) साथीदारांचा वापर करण्यात येईल.

५) गैरचित्रपट गीते, गझल, भजन आणि अभंग या कलाप्रकारात सादर करता येईल.

६) स्वर, ताल रचना आणि सर्वसाधारण सादरीकरणाचा प्रभाव यावर परीक्षकांचा निर्णय आधारीत राहील.

**ऊ) भारतीय समुहगान (Indian Group Song)**

१) प्रत्येक महाविद्यालयाचा ०१ (एक) संघ या कलाप्रकारात सहभागी होऊ शकेल.

२) एका संघामध्ये कमाल ०६ (सहा) गायक आणि कमाल ०३ (तीन) साथीदारांचा समावेश राहील. तथापि, गायक हे सादरीकरणा दरम्यान वाद्ये वाजवू शकतील.

३) प्रत्येक संघाला दोन गाण्यांचे सादरीकरण करावे लागेल ज्यामध्ये एक गीत देशभक्तीपर तर दुसरे गीत लोकसंगीतावर आधारीत राहील.

४) चित्रपट गीते सादर करता येणार नाहीत. समुहगीत कोणत्याही भारतीय प्रादेशिक किंवा राष्ट्रीय भाषेतले असावे.

५) प्रत्येक संघाला सादरीकरणाकरीता किमान ०८ (आठ) मिनिटे व कमाल १० (दहा) मिनिटांचा वेळ उपलब्ध राहील. ज्यामध्ये मंच व वाद्य रचना करण्याकरीता उपलब्ध करुन देण्यात आलेला वेळ समाविष्ठ राहणार नाही. तथापी मंच व वाद्य रचनेकरीता ०५ (पाच) मिनीटांपेक्षा अधिक कालावधी देण्यात येणार नाही. उद्घोषणेनंतर लगेचच सादरीकरणाची वेळ सुरु होईल.

६) सदर कला प्रकाराकरीता कमाल ०३ (तीन) सहवादकांचा वापर करता येईल तथापि सहभागी स्पर्धक वाद्यही वाजवू शकतील.

७) परीक्षकांचा निर्णय हा केवळ गायनाच्या दर्जावर आधारीत राहील. यामध्ये रंगभूषा, वेशभूषा व चमूच्या हावभावावर गुणदान करण्यात येणार नाही.

**ए) भारतीय लोकसंगीत वाद्यवृंद (Indian Folk Orchestra- Group Event)**

१) प्रत्येक महाविद्यालयाचा ०१ (एक) संघ या कलाप्रकारात सहभागी होऊ शकेल.

२) एका संघामध्ये किमान ०६ (सहा) व कमाल ०९ (नऊ) स्पर्धक आणि कमाल ०३ (तीन) साथीदार सहभागी होऊ शकतील. साथीदारांची वेषभूषा ही सहभागी विद्यार्थ्यांच्या वेषभूषेपेक्षा वेगळी असावी.

३) केवळ मुले/ मुली किंवा मिश्र पध्दतीचा समूह यामध्ये सहभागी होऊ शकेल.

४) सादरीकरणाकरीता किमान ०८ (आठ) व कमाल १० (दहा) मिनिटांचा कालावधी कलावंतांना उपलब्ध राहील.उद्घोषणेनंतर लगेचच सादरीकरणाची वेळ सुरु होईल.

५) वाद्य, मंच रचनेकरीता कमाल १० (दहा) मिनिटांचा कालावधी राहील.

६) महाराष्ट्रातील लोकसंगीतावर आधारीत वाद्याचा व लोकसंगीताचाच वापर करावा लागेल.

७) चित्रपटातील लोकसंगीताची धुन वापरता येणार नाही.

८) व्यावसायिक साथीदारांना विद्यार्थी कलावंतापासून काही अंतरावर उभे/ बसून सादरीकरण करता येईल. मात्र त्यांना चमूचे नेतृत्व करता येणार नाही.

९) लोकसंगीतातील ज्या स्वरमालिकांना लोकसंगीत म्हणून अधिकृत मान्यता आहे अशा स्वरमालिकांची प्राध्यान्याने निवड करण्यात यावी.

१०) परिक्षकांचा निर्णय हा केवळ सादरीकरणाच्या अस्सलपणा आधारीत राहील. यामध्ये रंगभूषा, वेशभूषा व चमुच्या हावभावावर गुणदान करण्यात येणार नाही.

**ऐ ) पाश्चिमात्य गायन (Western Vocal - Solo)**

१) प्रत्येक महाविद्यालयातून केवळ ०१ (एक) स्पर्धकास या स्पर्धेत सहभागी होता येईल.
२) गाणे केवळ इंग्रजी भाषेतील असावे.
३) स्पर्धक एकापेक्षा जास्त गाणे दिलेल्या वेळेत सादर करु शकतो.
४) सादरीकरणाकरीता किमान ०४ (चार) मिनिटे व कमाल ०६ (सहा) मिनिटांचा कालावधी देण्यात येईल. उद्घोषणेनंतर लगेचच सादरीकरणाची वेळ सुरु होईल.
५) मंच तथा वाद्य व्यवस्था करण्याकरीता कमाल ०३ (तीन) मिनिटांचा कालावधी देण्यात येईल.
६) सदर कला प्रकाराकरीता कमाल ०२ (दोन) साथीदारांचा वापर करण्यात येईल.
७) सिंथेसाईझरचा किंवा इतर इलेक्ट्रॉनिक्स वाद्यांचा सादरीकरणाकरीता वापर करता येईल.
८) चित्रपटातील गाणे गाण्यास परवानगी असेल.
९) लय, स्वर, ताल, ठेका, रचना आणि सर्वसामान्य सादरीकरणाचा प्रभाव यावर परीक्षकांचा निर्णय आधारीत राहील.

**ओ) पाश्चिमात्य वाद्यसंगीत (Western Instrumental - Solo)**

१) प्रत्येक महाविद्यालयातून केवळ ०१ (एक) स्पर्धकास या स्पर्धेत सहभागी होता येईल.
२) सादरीकरणासाठी पाश्चिमात्य स्वरवाद्य अथवा तालवाद्य वापरता येईल.
३) सादरीकरणाकरीता किमान ०५ (पाच) मिनिटे व कमाल ०७ (सात) मिनिटांचा कालावधी देण्यात येईल. उद्घोषणेनंतर लगेचच सादरीकरणाची वेळ सुरु होईल.
४) सदर कला प्रकाराकरीता कमाल ०२ (दोन) साथीदारांचा वापर करण्यात येईल.
५) गाणे हे एक किंवा अधिक पाश्चिमात्य शैलींचे मिश्रण असू शकते.
६) साथीदाराला सिंथेसाईझरचा किंवा इतर इलेक्ट्रॉनिक्स वाद्यांचा सादरीकरणाकरीता वापर करता येईल.
७) मंच तथा वाद्य व्यवस्था करण्याकरीता कमाल ३ (तीन) मिनिटांचा कालावधी देण्यात येईल.
८) ताल, ठेका आणि शांततेने केलेल्या सादरीकरणाचा प्रभाव यावर परीक्षकांचा निर्णय आधारीत राहील.

**औ) पाश्चिमात्य समूहगान (Group Song - Western)**

१) प्रत्येक महाविद्यालयाचा ०१ (एक) संघ या कलाप्रकारात सहभागी होऊ शकेल.
२) एका संघामध्ये किमान ०४ (चार) व कमाल ०६ (सहा) विद्यार्थ्यांचा आणि ०३ (तीन) साथीदारांचा समावेश राहील. तथापि, गायक हे सादरीकरणा दरम्यान वाद्ये वाजवू शकतील.
३) चित्रपट गीते सादर करता येतील. समुहगान मध्ये विद्यार्थी दिलेल्या वेळेत एकापेक्षा अनेक गीते सादर करु शकतील.
४) प्रत्येक चमुला सादरीकरणाकरीता किमान ०८ (आठ) व कमाल १० (दहा) मिनिटांचा वेळ उपलब्ध राहील. ज्यामध्ये मंच व वाद्य रचना करण्याकरीता उपलब्ध करुन देण्यात आलेला वेळ समाविष्ठ राहणार नाही. तथापि मंच व वाद्य रचनेकरीता ०५ (पाच) मिनिटांचा अधिक कालावधी देण्यात येईल. उद्घोषणेनंतर लगेचच सादरीकरणाची वेळ सुरु होईल.
५) प्रत्येक चमूला दोन गाण्यांचे सादरीकरण करावे लागेल ज्यामध्ये एक गीत देशभक्तीवर तर दुसरे गीत लोकसंगीतावर आधारीत राहील.
६) सादरीकरणाकरीता निवडण्यात येणारे गीत केवळ इंग्रजी भाषेत असावे.
७) समूहगानाचे परीक्षण हे संगीत रचना, गाण्याची निवड, एक सारखेपणा, गाण्याचा दर्जा, सादरीकरण व सर्व सामान्य प्रभावावर आधारीत असेल. मात्र वेषभूषा व रंगभूषा यावर गुणदान अवलंबून राहणार नाही.

२) <u>नृत्य</u> **(Dance)**

**अ) भारतीय शास्त्रीय नृत्य (Indian Classical Dance)**

१) प्रत्येक महाविद्यालयाचा ०१ (एक) स्पर्धक या कलाप्रकारात सहभागी होऊ शकेल.
२) शास्त्रीय नृत्य हे कोणत्याही अधिकृत नृत्य शाळेतील मान्यताप्राप्त प्रकारावर आधारीत असावे. जसे कथ्थक, कथकली, ओडीसी, भरत नाटयम, मणीपुरी, कुचीपूडी, मोहिनीअटटम इ.
३) सादरीकरणाकरीता किमान १२ (बारा) मिनिटे व कमाल १५ (पंधरा) मिनिटांचा कालावधी दिला जाईल. उद्घोषणेनंतर लगेचच सादरीकरणाची वेळ सुरु होईल.
४) रंगमंचावर वाद्य साहित्य लावण्यासाठी ०३ (तीन) मिनिटांचा कालावधी दिला जाईल.
५) कमाल ०३ (तीन) साथीदार या कलाप्रकाराकरीता साथसंगत करु शकतील.
६) चित्रपटातील शास्त्रीय नृत्ये या प्रकारात चालणार नाहीत.
७) पंचाचा निर्णय हा ताल, तंत्र, लय, हावभाव, वेशभुषा, पदलालित्य व सर्वसामान्य सादरीकरणाच्या प्रभाव यावर अवलंबून असेल.
८) कलावंतास नृत्याचे स्पष्टीकरण देणारे सारांश आणि साथीला उपयोगात आणल्या जाणारे गीत त्यांचे मराठी, हिंदी अथवा इंग्रजीमध्ये अनुवाद करुन नोंदणी करते वेळी ०३ (तीन) प्रतींमध्ये नोंदणी कक्षावर सादर करावे लागेल.

**आ) भारतीय लोक समुहनृत्य (Indian Folk Dance - Group Dance)**

१) प्रत्येक महाविद्यालयाचा ०१ (एक) संघ या कलाप्रकारात सहभागी होऊ शकेल.
२) किमान ०८ (आठ) व कमाल १० (दहा) स्पर्धक या कलाप्रकारात सहभाग घेऊ शकतील. ज्यामध्ये केवळ मुले/ मुली अथवा मिश्रगट सहभागी होऊ शकेल.
३) लोकनृत्य/ आदिवासी नृत्य भारतीय शैली मधील असावे. यामध्ये शास्त्रीय नृत्यांचा समावेश नसावा.
४) कलाप्रकाराच्या सादरीकरणाकरीता किमान ८ (आठ) मिनिटे व कमाल १० (दहा) मिनिटांचा कालावधी दिला जाईल. उद्घोषणेनंतर लगेचच सादरीकरणाची वेळ सुरु होईल.
५) रंगमंच तथा वाद्यवृंद व्यवस्थेकरीता ०५ (पाच) मिनिटांचा कालावधी उपलब्ध करुन दिला जाईल.
६) कमाल ०५ (पाच) साथीदार या कलाप्रकाराकरीता साथसंगत करु शकतील.
७) चित्रपटातील कोणत्याही प्रकारचे गीत या कलाप्रकारात सादर करता येणार नाही.
८) ध्वनीमुद्रीत संगीत या प्रकारात चालणार नाहीत.
९) पंचाचा निर्णय हा अस्सलपणा, अधिकृतपणा, ताल, सांघिकपणा, भावमुद्रा, वेशभूषा, रंगभूषा व सर्वसाधारण सादरीकरणाचा प्रभाव यावर आधारीत राहील.
१०) नोंदणी कक्षामध्ये सादरीकरण करत असलेल्या लोकनृत्याची संकल्पना व संपूर्ण लोकगीत व सारांश ०३ (तीन) प्रतींमध्ये सादर करावे लागेल.
११) सहभागी चमूचे सादरीकरणानंतर रंगमंचावर केलेली सजावट तथा साहित्य काढून नेण्याची जबाबदारी सहभागी चमूची राहीत. त्याकरीता ०२ (दोन) मिनिटांचा वेळ आरक्षीत केलेला असेल.

**३) वाड्मयीन कला प्रकार (Literary Event)**

**अ) वक्तृत्व स्पर्धा (Elocution)**

१. प्रत्येक महाविद्यालयाचा ०१ (एक) स्पर्धक यामध्ये सहभागी होऊ शकेल.
२. सादरीकरणाकरिता मराठी, हिंदी किंवा इंग्रजी भाषेचा उपयोग करावा लागेल.
३. प्रत्येक वक्त्याला किमान ०४ (चार) मिनीटे व कमाल ०५ (पाच) मिनीटांचा अवधी सादरीकरणाकरिता उपलब्ध करुन दिला जाईल. उद्घोषणेनंतर लगेचच सादरीकरणाची वेळ सुरु होईल.
४. वक्तृत्वाचे विषय व्यवस्थापकाच्या सभेमध्ये सांगितले जातील.
५. सादरीकरण हे फक्त गद्यावर आधारीत असावे व यामध्ये कवितांचा व गीतांचा वापर करता येणार नाही.
६. कुठल्याही प्रकारचे वाचन करण्यास मनाई आहे.
७. विषयांची ओळख, ज्ञान, अभ्यास, सादरीकरण, भाषेची पध्दती आणि सर्वसाधारण सादरीकरण यांवर पंचाचा निर्णय आधारभूत असेल.

**आ) वादविवाद स्पर्धा (Debate)**

१. वादविवादाकरिता प्रत्येक महाविद्यालयातील ०२ (दोन) विद्यार्थी सहभागी असतील.
२. वादविवादाचे विषय व्यवस्थापकांच्या सभेमध्ये सांगितले जातील.
३. पहिला वक्ता विषयाच्या बाजुने बोलेल आणि दुसरा वक्ता विषयांच्या विरोधी बाजूने बोलेल.
४. दोन्ही सहभागी स्पर्धक मराठी, हिंदी किंवा इंग्रजी भाषेत सादरीकरण करतील तथापी दोन्ही स्पर्धक एकाच भाषेत अथवा वेगळया भाषेत सादरीकरण करु शकतील परंतु एक सहभागी स्पर्धक एकाच भाषेत सादरीकरण करेल.
५. प्रत्येक स्पर्धकाला किमान ०४ (चार) मिनीटे व कमाल ०५ (पाच) मिनिटांचा अवधी सादरीकरणाकरीता उपलब्ध असेल. उद्घोषणेनंतर लगेचच सादरीकरणाची वेळ सुरु होईल.
६. वाचून सादरीकरण करता येणार नाही.
७. विषयाची ओळख, ज्ञान, विषयाचा अभ्यास, विषय,सादरीकरण, भाषेची पध्दत आणि सर्वधारण सादरीकरण यांवर पंचाचा निर्णय आधारभूत असेल.

**४) रंगमंचीय कलाप्रकार (Theater)**

**अ) नक्कल (Mimicry)**

१. प्रत्येक महाविद्यालयाचा एक स्पर्धक यामध्ये सहभागी होऊ शकेल.
२. सादरीकरणाकरीता किमान ०४ (चार) मिनिटे व कमाल ०५ (पाच) मिनिटांचा कालावधी उपलब्ध राहील. उद्घोषणेनंतर लगेचच सादरीकरणाची वेळ सुरु होईल.
३. सहभागी स्पर्धक उपकरणांचा, विशेष नावाजलेल्या व्यक्तीमत्त्वांचा व भाषणांच्या आवाजाची नक्कल करु शकतो.
४. रंगमंचावर सादर करणारे पात्र घोषित करण्याची मान्यता आहे.
५. परिक्षण हे अनुकरणाचे कौशल्य, ध्वनी आणि आवाजाची विविधता यावर आधारित असेल.

**आ) मुक अभिनय (Mime)**

१. एक महाविद्यालयाच्या संघामध्ये किमान ०४ (चार) व कमाल ६ (सहा) विद्यार्थ्यांचा समावेश राहील.
२. सहभागी स्पर्धक पांढऱ्या व काळया रंगाची वेषभुषा परिधान करतील आणि चेहरा, भुवया व ओठ रंगवतील.
३. सादरीकरणाकरिता किमान ०४ (चार) व कमाल ०५ (पाच) मिनीटांचा कालावधी दिला जाईल. आयोजकांच्या अंतीम उद्घोषणेनंतर स्पर्धकांनी त्वरीत सादरीकरण करावे.
४. रंगमंचावरील व्यवस्था / संगीत उपकरणांची व्यवस्था करणेसाठी कमाल कालावधी ०३ (तीन) मिनीटांचा राहील.
५. जास्तीत जास्त ०२ (दोन) सहकलाकारास मान्यता असेल.
६. अभिनयाच्या माध्यमातुन दिलेल्या विषयाचे महत्व, चेहऱ्यावरील हावभाव व अभिनय यास महत्व दिले जाईल. कुठल्याही साहित्यांचा वापर करण्यास मनाई राहील. तथापी मुक अभिनयाचे सादरीकरण प्रभावशील होण्यासाठी संगीताचा वापर करण्यास परवानगी असेल.
७. कल्पकता, सर्जनशीलता, सादरीकरण, वेषभुषा व सर्वसामान्य प्रभाव या आधारावर परीक्षण केले जाईल.

**इ) प्रहसन (Skit)**

१. या स्पर्धेत कमाल ०६ (सहा) विद्यार्थ्यांचा समावेश राहील.
२. सादरीकरणाकरीता किमान ०८ (आठ) व कमाल १० (दहा) मिनिटांचा कालावधी दिला जाईल. आयोजकांच्या अंतीम उद्घोषणेनंतर किंवा पडदा पुर्ण उघडल्यानंतर यापैकी जे आधी होईल त्याप्रमाणे स्पर्धकांनी त्वरीत सादरीकरण करावे.
३. रंगमंचावरील व्यवस्था/ संगीत उपकरणांची व्यवस्था करणेसाठी कमाल कालावधी ०३ (तीन) मिनिटांचा राहील.
४. जास्तीत जास्त ०३ (तीन) सहकलाकारास मान्यता असेल.
५. प्रहसन सर्वसामान्यप्रमाणे राष्ट्रीय किंवा सामाजिक विषयावर प्रकाश टाकणारा महत्वाचा असावा.
६. सादरकरणामध्ये वैयक्तिक टिका, कुत्सीतपणा, कडवटपणा, अश्लिलपणा इ. करण्यास मनाई राहील. निरागसपणे व विनोदबुध्दीने केलेले सादरीकरण अपेक्षीत असेल.
७. विषयाचा दर्जा, अभिनय, समन्वय आणि सर्वसाधारण सादरीकरणाचा प्रभाव या आधारावर परिक्षण केले जाईल.

## ५) ललित कला (Fine Arts)

### अ) स्थळ चित्र (On the Spot Painting)

१. प्रत्येक महाविद्यालयाचा ०१ (एक) स्पर्धक यामध्ये सहभागी होऊ शकेल.
२. प्रत्येक स्पर्धकाला परिक्षकाने/ आयोजकांनी दिलेल्या विषयावर आधारीत स्थळचित्र स्पर्धास्थळी काढावे लागेल.
३. वेळ मर्यादा ही 2½ तासाची राहील.
४. चित्र काढण्यासाठी दिलेला कागदाचा अर्ध शाही आकार असावा. म्हणजे २२ इंच लांबी व १५ इंच रुंदी. सदरील कागद हा आयोजक महाविद्यालय पुरवेल.
५. काढण्यात येणारे तैलचित्र, पाणी, पोस्टर किंवा पेस्टल रंगामध्ये काढता येईल.
६. रंगकामाकरीता आवश्यक असलेले साहित्य जसे कुंचले, रंग, पेन्सील आदी स्पर्धकास स्वतः आणावे लागेल.
७. स्थळचित्रांचा बोलकेपणा, विषयाची योग्य मांडणी, जुळणी, रंगांचा उपयोग व सर्व समावेशक प्रभाव यावर आधारीत परिक्षण केले जाईल.
८. स्पर्धे दरम्यान स्पर्धकासोबत मोबाईल तसेच इतर सोबती असू नये.

### आ) चिकटकला (Collage)

१. प्रत्येक महाविद्यालयाचा ०१ (एक) स्पर्धक यामध्ये सहभागी होऊ शकेल.
२. प्रत्येक स्पर्धकाला परिक्षकाने/ आयोजकांनी दिलेल्या विषयावर आधारीत चिकटकला स्पर्धास्थळी काढावे लागेल.
३. वेळ मर्यादा ही 2½ तासाची राहील.
४. चिकटकलेसाठी दिलेला माऊंट बोर्ड पेपर हा अर्ध शाही आकार असावा. म्हणजे २२ इंच लांबी व १५ इंच रुंदी. सदरील माऊंट बोर्ड पेपर हा आयोजक महाविद्यालय पुरवेल.
५. चिकटकला ही जुन्या मासिकातून बनवायची आहे व ही जुनी मासिके आयोजक महाविद्यालय पुरवेल.
६. चिकटकलेसाठी लागणा-या वस्तू व इतर आवश्यक साहित्य स्पर्धकाने स्वतः आणावे.
७. चिकटकलेचा बोलकेपणा, विषयाची योग्य मांडणी, जुळणी, रंगांचा उपयोग व सर्व समावेशक प्रभाव यावर आधारीत परिक्षण केले जाईल.

**इ) पोस्टर मेकिंग (Poster Making)**

१. प्रत्येक महाविद्यालयाचा ०१ (एक) स्पर्धक यामध्ये सहभागी होऊ शकेल.
२. प्रत्येक स्पर्धकाला परिक्षकाने/ आयोजकांनी दिलेल्या विषयावर आधारीत चिकटकला स्पर्धास्थळी काढावे लागेल.
३. वेळ मर्यादा ही 2½ तासाची राहील.
४. चिकटकलेसाठी दिलेला माऊंट बोर्ड पेपर हा अर्ध शाही आकार असावा. म्हणजे २२ इंच लांबी व १५ इंच रुंदी. सदरील माऊंट बोर्ड पेपर हा आयोजक महाविद्यालय पुरवेल.
५. काढण्यात येणारे पोस्टर पाणी, पोस्टर किंवा पेस्टल रंगामध्ये काढता येईल.
६. पोस्टरकरीता आवश्यक असलेले साहित्य जसे कुंचले, रंग, पेन्सील आदी स्पर्धकास स्वतः आणावे लागेल.
७. पोस्टरचा बोलकेपणा, विषयाची योग्य मांडणी, जुळणी, रंगांचा उपयोग व सर्व समावेशक प्रभाव व घोषवाक्य यावर आधारीत परिक्षण केले जाईल.

**ई) माती कला (Clay Modeling)**

१. प्रत्येक महाविद्यालयातून ०१ (एक) स्पर्धक यामध्ये सहभागी होऊ शकेल.
२. प्रत्येक स्पर्धकाला परिक्षकाने/ आयोजकांनी दिलेल्या विषयावर आधारीत मातीकला स्पर्धास्थळी करावी लागेल.
३. वेळ मर्यादा ही 2½ तासाची राहील.
४. मातीकलेसाठी लागणारी माती ही आयोजक महाविद्यालयातर्फे पुरविण्यात येईल.
५. मातीसाठी लागणारे साहित्य हे स्पर्धकाने स्वतः आणावयाचे आहे.
६. मातीकलेचे परिक्षण हे बोलकेपणा, विषयाची हाताळणी, माती कामाची हातोटी, जुळणी, सादरीकरण व सर्व समावेशक प्रभाव यावर आधारीत राहील.

**उ) व्यंगचित्र (Cartooning)**

१. प्रत्येक महाविद्यालयातून ०१ (एक) स्पर्धक यामध्ये सहभागी होऊ शकेल.
२. प्रत्येक स्पर्धकाला परिक्षकाने/ आयोजकांनी दिलेल्या विषयावर आधारीत मातीकला स्पर्धास्थळी काढावे लागेल.
३. वेळ मर्यादा ही 2½ तासाची राहील.
४. चित्र काढण्यासाठी दिलेला कागदाचा अर्ध शाही आकार असावा. म्हणजे २२ इंच लांबी व १५ इंच रुंदी सदरील कागद हा आयोजक महाविद्यालय पुरवेल.
५. व्यंगचित्रासाठी आवश्यक असलेले साहित्य जसे कुंचले, रंग, पेन्सील आदी स्पर्धकास स्वतः आणावे लागेल.
६. व्यंगचित्रासाठी परिक्षण हे बोलकेपणा, विषयाची योग्य मांडणी, व्यंगचित्रातील पात्र, रंगाचा उपयोग व सर्व समावेशक प्रभाव यावर आधारीत राहील.

**ऊ) रांगोळी (Rangoli)**

१. प्रत्येक महाविद्यालयातून ०१ (एक) स्पर्धक यामध्ये सहभागी होऊ शकेल.
२. प्रत्येक स्पर्धकाला परिक्षकाने/ आयोजकांनी दिलेल्या विषयावर आधारीत रांगोळी स्पर्धास्थळी काढावे लागेल.
३. वेळ मर्यादा ही 2½ तासाची राहील.
४. रांगोळीसाठी लागणारी जागा ही १२० से.मी. x १२० सें.मी. इतकी असेल.
५. कला सादरीकरणात रांगोळी पावडर, रंगीत पावडरचा वापर करता येईल.
६. रांगोळीसाठी लागणारे साहित्य स्पर्धकाला स्वतः आणावे लागेल.
७. रांगोळीचे परिक्षण हे बोलकेपणा, विषयाची योग्य मांडणी, रांगोळीतील घटक, रंगाचा उपयोग व सर्वसमावेशक प्रभाव यावर आधारीत राहील.

**ए) स्थळ छायाचित्रण (Spot Photography)**

१. प्रत्येक महाविद्यालयातून ०१ (एक) स्पर्धक यामध्ये सहभागी होऊ शकेल.
२. स्पर्धकाने स्वत:चा डिजीटल कॅमेरा सोबत आणावा.
३. डिजीटल कॅमे-यामध्ये मेमरी कार्ड असावे. स्पर्धा आरंभ होण्यापुर्वी परीक्षकांव्दारे मेमरी कार्ड फॉरमॅट केले जाईल.
४. वेळ मर्यादा ही 2½ तासाची राहील.
५. स्पर्धकाने दिलेल्या विषयावर फक्त ०५ (पाच) छायाचित्रे ही परिक्षकांकडे द्यावीत.
६. छायाचित्रांचे मिक्सिंग, मॅचिंग किंवा मार्फिंग करता येणार नाही.
७. फोटोशॉप, पिकासा इत्यादी सारखे सॉफ्टवेअर वापरण्याची अनुमती राहणार नाही.
८. काढलेली छायाचित्रे आवश्यक त्या ठिकाणी वापरण्याची अनुमती आयोजकांना राहील.
९. उपरोक्त व्यतिरिक्त अधिक सूचना वेळेवर देण्यात येईल.
१०. डिजीटल इमेजेसचे परीक्षक हे विशिष्ट विषयावरील प्रभाव, संरचना, तांत्रिक स्तर व अनुरुपता यावर आधारीत केले जाईल.

**ओ) इन्स्टॉलेशन (Installation)**

१. प्रत्येक महाविद्यालयातून किमान ०३ (तीन) व कमाल ०४ (चार) स्पर्धक यामध्ये सहभागी होऊ शकतील.
२. प्रत्येक स्पर्धकाला परिक्षकाने/ आयोजकांनी दिलेल्या विषयावर आधारीत इन्स्टॉलेशन स्पर्धास्थळी करावे लागेल.
३. इन्स्टॉलेशन हे ५ फुट x ५ फुट x ५ फुट पेक्षा मोठे नसावे व प्रत्येक विद्यापीठ संघाने एकच इस्टालेशन सादर करावे.
४. वेळ मर्यादा ही 2½ तासाची राहील.
५. सहभागी स्पर्धक इतर सर्व ललितकला संबंधीत सर्व कला प्रकारांसाठी लागणा-या साहित्यांचा वापर करु शकतात.
६. सहभागी स्पर्धक हे आयोजन स्थळ परिसरातील टाकाऊ वस्तू किंवा उपलब्ध असलेल्या इतर कोणत्याही साहित्याचा वापर करु शकतात.
७. सहभागी स्पर्धकाने बाजार पेठेत तयार असलेल्या कुठल्याही वस्तूचा वापर करण्यास मनाई असेल ते त्यांची कलाकृती ही कच्चा मालापासून तयार करु शकतात.
८. इन्स्टॉलेशनचे परिक्षण हे बोलकेपणा, विषयाची योग्य मांडणी, कामाची हातोटी, सादरीकरण व सर्वसमावेशक प्रभाव यावर आधारीत राहील.

**औ) मेंहदी (Mehandi)**

१) स्पर्धेत एका महाविद्यालयाचा एक स्पर्धक व एक सहकारी भाग घेऊ शकेल.
२) स्पर्धकाने आपल्या सहकाऱ्याच्या दोन्ही हाताच्या कोपरापर्यंत मेंहदी काढावयाची आहे.
३) सहकारी हा / ही महाविद्यालयातील नियमीत प्रवेशित विद्यार्थी/विद्यार्थीनी असणे आवश्यक आहे.
४) वेळ मर्यादा ही 2½ तासाची राहील.
५) मेंहदीसाठी कोन स्पर्धकाने आणावयाचा असून इतर दुसरे कोणतेही डेकोरेटीव्ह मटेरियल आणू नये.
६) मेहंदीचे परीक्षण करतांना अस्सलता, कलात्मकता आणि सर्जनशीलता विचारात घेतली जाईल.

*** पोस्टर प्रदर्शन :-**

आंतर महाविद्यालयीन युवक महोत्सव युवारंग- २०२२ पासून पथसंचलना ऐवजी पोस्टर प्रदर्शन स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. त्यात ६ x ४ च्या पोस्टरवर सामाजिक संदेश देणारा आशय असावा. यामधून परिक्षण करुन प्रथम, व्दितीय व तृतीय पुरस्कार देण्यात येतील.

## ♦ आंतर महाविद्यालयीन युवक महोत्सव युवारंग 2022 ♦

### कला प्रकारातील स्पर्धक संख्या, साथीदार संख्या व स्पर्धेचा कालावधी (पूर्व तयारीसह) माहिती तालीका

| कला प्रकार | स्पर्धक संख्या | साथीदार संख्या | एकूण | स्पर्धा कालावधी |
|---|---|---|---|---|
| 1) **संगीत (Music)** | | | | |
| अ) भारतीय शास्त्रीय गायन (Indian Classical Solo) | 1 | 2 | 3 | 10 मि. |
| आ) भारतीय शास्त्रीय वाद्य संगीत (तालवाद्य) (Indian Classical Instrumatal Solo Percussion) | 1 | 1 | 2 | 10 मि. |
| इ) भारतीय शास्त्रीय वाद्य संगीत (स्वरवाद्य) (Indian Classical Instrumatal Solo Non-Percussion) | 1 | 1 | 2 | 10 मि. |
| ई) नाटयसंगीत (Natyasangeet- Solo Event) | 1 | 2 | 3 | 7 मि. |
| उ) भारतीय सुगम संगीत (Indian Light Vocal) | 1 | 2 | 3 | 6 मि. |
| ऊ) भारतीय समूहगान (Indian Group Song) | 6 | 3 | 9 | 10 मि. |
| ए) भारतीय लोकसंगीत वाद्यवृंद (Indian Flock Orchestra- Group Event) | 9 | 3 | 12 | 10 मि. |
| ऐ) पाश्चिमात्य गायन (Western Vocal - Solo) | 1 | 2 | 3 | 6 मि. |
| ओ) पाश्चिमात्य वाद्यसंगीत (Western Instrumatal-Solo) | 1 | 2 | 3 | 7 मि. |
| औ) पाश्चिमात्य समूहगान (Western Group Song) | 6 | 3 | 9 | 10 मि. |
| 2) **नृत्य (Dance)** | | | | |
| अ) भारतीय शास्त्रीय नृत्य (Indian Classical Dance) | 1 | 3 | 4 | 15 मि. |
| आ) भारतीय लोक समूहनृत्य (Indian Folk Dance-Group Dance) | 10 | 5 | 15 | 10 मि. |
| **3) वाड्मयीन कला प्रकार (Literary Event)** | | | | |
| अ) वक्तृत्व स्पर्धा (Elocation) | 1 | --- | 1 | 5 मि. |
| आ) वादविवाद स्पर्धा (Debate) | 2 | --- | 2 | 5 मि |
| **4) रंगमंचीय कला प्रकार (Theatre)** | | | | |
| अ) नक्कल (Mimicy) | 1 | - | 1 | 5 मि. |
| आ) मुक अभिनय (Mime) | 6 | 2 | 8 | 5 मि. |
| इ) प्रहसन (Skit) | 6 | 3 | 9 | 10 मि. |
| **5) ललित कला (Fine Art)** | | | | |
| अ) स्थळ चित्र (On the Spot Painting) | 1 | --- | 1 | 2.30 तास |
| आ) चिकटकला (Collage) | 1 | --- | 1 | 2.30 तास |
| इ) पोस्टर मेकींग (Poster Making) | 1 | --- | 1 | 2.30 तास |
| ई) माती कला (Clay Modeling) | 1 | --- | 1 | 2.30 तास |
| उ) व्यंगचित्र (Cartooning) | 1 | --- | 1 | 2.30 तास |
| ऊ) रांगोळी (Rangoli) | 1 | --- | 1 | 2.30 तास |
| ए) स्थळ छायाचित्र (Spot Photography) | 1 | --- | 1 | 2.30 तास |
| ओ) इंस्टालेशन (Installation) | 4 | --- | 4 | 2.30 तास |
| औ) मेंहदी (Mehandi) | 1 | 1 | 2 | 2.30 तास |

## ♦ आंतर महाविद्यालयीन युवक महोत्सव युवारंग 2022 कलाप्रकार ♦
## प्रथम, द्वितीय व तृतीय विजेता साठी गुणतालीका

| कला प्रकार | प्रथम | द्वितीय | तृतीय |
|---|---|---|---|
| **1) संगीत (Music)** | | | |
| अ) भारतीय शास्त्रीय गायन (Indian Classical Solo) | 5 | 3 | 2 |
| आ) भारतीय शास्त्रीय वाद्य संगीत (तालवाद्य) (Indian Classical Instrumatal Solo Percussion) | 5 | 3 | 2 |
| इ) भारतीय शास्त्रीय वाद्य संगीत (स्वरवाद्य) (Indian Classical Instrumatal Solo Non-Percussion) | 5 | 3 | 2 |
| ई) नाटयसंगित (Natyasangeet- Solo Event) | 5 | 3 | 2 |
| उ) भारतीय सुगम संगीत (Indian Light Vocal) | 5 | 3 | 2 |
| ऊ) भारतीय समूहगान (Indian Group Song) | 7 | 5 | 3 |
| ए) भारतीय लोकसंगीत वाद्यवृंद (Indian Flock Orchestra- Group Event) | 7 | 5 | 3 |
| ऐ) पाश्चिमात्य गायन (Western Vocal - Solo) | 5 | 3 | 2 |
| ओ) पाश्चिमात्य वाद्यसंगीत (Western Instrumatal-Solo) | 5 | 3 | 2 |
| औ) पाश्चिमात्य समूहगान (Western Group Song) | 7 | 5 | 3 |
| **2) नृत्य (Dance)** | | | |
| अ) भारतीय शास्त्रीय नृत्य (Indian Classical Dance) | 5 | 3 | 2 |
| आ) भारतीय लोक समूहनृत्य (Indian Folk Dance-Group Dance) | 7 | 5 | 3 |
| **3) वाड्मयीन कला प्रकार (Literary Event)** | | | |
| अ) वक्तृत्व स्पर्धा (Elocation) | 5 | 3 | 2 |
| आ) वादविवाद स्पर्धा (Debate) | 7 | 5 | 3 |
| **4) रंगमंचीय कला प्रकार (Theatre)** | | | |
| अ) नक्कल (Mimicy) | 5 | 3 | 2 |
| आ) मुक अभिनय (Mime) | 7 | 5 | 3 |
| इ) प्रहसन (Skit) | 7 | 5 | 3 |
| **5) ललित कला (Fine Art)** | | | |
| अ) स्थळ चित्र (On the Spot Painting) | 5 | 3 | 2 |
| आ) चिकटकला (Collage) | 5 | 3 | 2 |
| इ) पोस्टर मेकींग (Poster Making) | 5 | 3 | 2 |
| ई) माती कला (Clay Modeling) | 5 | 3 | 2 |
| उ) व्यंगचित्र (Cartooning) | 5 | 3 | 2 |
| ऊ) रांगोळी (Rangoli) | 5 | 3 | 2 |
| ए) स्थळ छायाचित्र (Spot Photography) | 5 | 3 | 2 |
| ओ) इंस्टालेशन (Installation) | 7 | 5 | 3 |
| औ) मेंहदी (Mehandi) | 5 | 3 | 2 |

**युवक महोत्सवाचे उद्‌घाटन झाल्यानंतर प्रत्यक्ष स्पर्धेपुर्वी महाविद्यालय विद्यार्थी हे स्पर्धक विद्यार्थ्यांना खालीलप्रमाणे प्रतिज्ञा देतील.**

## ♦ प्रतिज्ञा ♦

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील आम्ही सर्व विद्यार्थी विद्यार्थीनी या युवक महोत्सवामध्ये भारतीय कलेचा वारसा घेऊन स्वत:च्या कलागुणांचा विकास साधण्यासाठी सहभागी होत आहोत. आमचा सहभाग उत्कर्षमय, आनंदमय करण्यासाठी भारतीय परंपरेतील वैचारिक सामंजस्य व सहिष्णुता आम्ही आमच्या अंगी बाळगुन हा युवक महोत्सव आनंदमय करु. जाती धर्मा पलिकडील सामुहिक सहजीवन, दुर्बलांची जाण, वैचारिक अधिष्ठान, त्याग भावना व प्रसंगी न्याय भूमिकेसाठी संघर्ष करण्याची तयारी यातूनच राष्ट्र निर्माण होत असते. याची आम्हास जाणीव आहे. आमच्या उदात्त, उदार सांस्कृतिक परंपरेला साक्षी ठेवून बुध्दीनिष्ठ व विवेकनिष्ठ जीवन जगण्यासाठी कटीबध्द होणे हे आम्ही आमचे कर्तव्य समजतो. युवक महोत्सवातून उपरोक्त सर्व बाबी आमच्यामध्ये विकसीत व्हाव्यात यासाठी हा युवक महोत्सव संपूर्णत: शांततेत आणि आनंदात पूर्ण करण्याची आम्ही प्रतिज्ञा करीत आहोत.

जयहिंद जयहिंद जयहिंद

---

।। अंतरी पेटवू ज्ञानज्योत ।।

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

## आंतर महाविद्यालय युवक महोत्सव युवारंग 2022 कालावधी दि. 9 ते 13 फेब्रुवारी, 2023

## स्थळ - तापी परिसर विद्या मंडळाचे, धनाजी नाना महाविद्यालय, फैजपूर, जि. जळगाव

| दिनांक | वेळ | आंतर महाविद्यालय युवक महोत्सव युवारंग 2022 चे वेळापत्रक (Youth Festival 2022 Time Table) |
|---|---|---|
| 9/02/2023 गुरुवार | दु. 1.00 ते 5.30 वा. | संघाचे आगमन व नोंदणी |
| | संध्याकाळी 7.00 वा. | संघव्यवस्थापकांची सभा - स्थळ :- रंगमंच क्र. 3 घनश्याम काशीराम पाटील रंगमंच |

| | | रंगमंच क्र. 1<br>कै. सुनीत भाई बोंडे रंगमंच | रंगमंच क्र. 2<br>कै. व्ही.डी. फिरके रंगमंच | रंगमंच क्र. 3<br>कै. घनश्याम काशीराम पाटील रंगमंच | रंगमंच क्र. 4<br>कै. वजीर चांदख्रा तडवी रंगमंच | रंगमंच क्र. 5<br>कै. बाजीराव नाना पाटील रंगमंच |
|---|---|---|---|---|---|---|
| 10/02/2023<br>शुक्रवार | सकाळी 9.00 वा. | **युवक महोत्सव युवारंग- 2022 उद्घाटन सोहळा स्थळ :- रंगमंच क्र. 1 कै. सुनीत भाई बोंडे रंगमंच** | | | | |
| | दुपारी 1.00 वा. | प्रहसन<br>(skits) | भारतीय समुहगान<br>(Indian Group Song) | वक्तृत्व<br>(Elocation) | भारतीय शास्त्रीय वाद्यसंगीत (स्वरवाद्य)<br>(Indian Classical Instrumental Solo- NP) | स्थळ चित्र<br>(On the Spot Painting) |
| | दुपारी 4.00 वा. | प्रहसन<br>(skits) | भारतीय समुहगान<br>(Indian Group Song) | वक्तृत्व<br>(Elocation) | भारतीय शास्त्रीय वाद्यसंगीत (तालवाद्य)<br>(Indian Classical Instrumental Solo- P) | व्यंगचित्र<br>(Cartooning) |
| | सायं. 8.30 वा. | **संघ व्यवस्थापकांची सभा- स्थळ :- रंगमंच क्र. 3 कै. घनश्याम काशीराम पाटील रंगमंच** | | | | |
| 11/02/203<br>शनिवार | सकाळी 9.00 वा. | मुक अभिनय<br>(Mime) | पाश्चीमात्य गायन<br>(Westen Vocal Solo) | वादविवाद स्पर्धा<br>(Debate) | भारतीय सुगम संगीत<br>(Indian Light Vocal) | चिकटकला<br>(Collage) |
| | सकाळी 12.00 वा. | मुक अभिनय<br>(Mime) | पाश्चीमात्य समुहगान<br>(Group Song Westen) | वादविवाद स्पर्धा<br>(Debate) | भारतीय सुगम संगीत<br>(Indian Light Vocal) | मातीकला<br>(Clay Modeling) |
| | दुपारी 3.00 वा. | नक्कल<br>(Mimicry) | पाश्चीमात्य वाद्यसंगीत<br>(Western Instumental Solo) | स्थळ छायाचित्र<br>(Spot Photography) प्रथम फेरी | भारतीय शास्त्रीय गायन<br>(Indian Classical Solo) | इंस्टालेशन<br>(Installation) |
| | सायं. 8.30 वा. | **संघ व्यवस्थापकांची सभा- स्थळ :- रंगमंच क्र. 3 कै. घनश्याम काशीराम पाटील रंगमंच** | | | | |
| 12/02/2023<br>रविवार | सकाळी 9.00 वा. | भारतीय लोक समुह नृत्य<br>(Indian Folk Dance- Group Dance) | भारतीय शास्त्रीय नृत्य<br>(Indian Classical Dance) | स्थळ छायाचित्र<br>(Spot Photography) अंतीम फेरी | नाटय संगीत<br>(Natya Sangeet-Solo Event) | पोस्टर मेकींग<br>(Poster Making) |
| | दुपारी 1.00 वा. | भारतीय लोक समुह नृत्य<br>(Indian Folk Dance- Group Dance) | भारतीय लोक संगीत वाद्यवृंद<br>(Indian Folk Orchestra- Group Event) | | मेहंदी<br>(Mehandi) | रांगोळी<br>(Rangoli) |
| | संध्या. 8.30 वा. | **संघ व्यवस्थापकांची सभा- स्थळ :- रंगमंच क्र. 3 कै. घनश्याम काशीराम पाटील रंगमंच** | | | | |
| 13/02/2023<br>सोमवार | सकाळी 10.00 वा. | **पारितोषिक वितरण आणि समारोप सोहळा स्थळ :- रंगमंच क्र. 1 कै. सुनीत भाई बोंडे रंगमंच** | | | | |

टिप :- 1) कार्यक्रम/ स्पर्धा दररोज सकाळी 9.00 वाजता वेळापत्रकाप्रमाणेच सुरु होतील याची संघव्यवस्थापकांनी नोंद घ्यावी.
2) दररोज दुपारच्या भोजनाची वेळ सकाळी 11.00 ते 1.00 व रात्रीच्या भोजनाची वेळ 7.00 ते 8.30 असेल 3) महोत्सवासाठी सर्व संघव्यवस्थापकांचे सहकार्य अपेक्षीत आहे.

(Sd/-xxx)
प्राचार्य डॉ. पी.आर.चौधरी
**संयोजक प्रमुख, युवारंग -2022**

Shahada Taluka Educational Society & Co-Operative Educational Society Ltd.

# Institute of Management Research and Development

Shahada Dist- Nandurbar

**Asst.Prof. Anil R. Patil**
**(M.Sc.,M.B.A.)**
**Director**
**Mo.9423435038**

College Phone
02565-223122, 223532
**College Code: - 230102**

**Shri. Motilal F. Patil**
(M.Sc., Agri.)
**Chairman**

Website-www.stcimrd.ac.in

E-Mail:- stcoopimrdshahada@gmail.com

Date:-22-02-2022

## NOTICE

All the Teachers/students are here by informed that, **Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon and PSGVPM College of Pharmacy and S.I.Patil Arts, G.B.Patel Science and S.T.K.V.S. Commerce College, Shahada** will be organizing the following program as per the given schedule.

We request the presence of all teachers and students for this important event. Your attendance is expected to be on time to ensure the smooth running of the program.

**Program Details**

Name of Program : - Yuvarang – 2021

Date : - 19 – 23 April 2022

Venue : - PSGVPM College of Pharmacy and S.I.Patil Arts, G.B.Patel Science and S.T.K.V.S. Commerce College, Shahada

S.T.E.S. & Co-Op.E.S.Ltd. IMRD Shahada

DIRECTOR
S.T.E.S. & Co-Op.Edu. Society Ltd.
Institute of Management
Research & Development
Shahada, Dist. Nandurbar

|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

**Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon**

(पूर्वीचे उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव)

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

## विद्यार्थी विकास विभाग

जा.क्र. कबचौउमवि/14/युम-33/144/2022 दि.06/04/2022

**आंतर महाविद्यालय युवक महोत्सव युवारंग २०२१**

प्रति,

१) मा.प्राचार्य / मा. संचालक / विभाग प्रमुख,
विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालय / मान्यता प्राप्त परिसंस्था

२) मा.संचालक / विभाग प्रमुख, विद्यापीठ शैक्षणिक प्रशाळा-विभाग यांना..

**विषय :- आंतर महाविद्यालयीन युवक महोत्सव युवारंग २०२१ बाबत...**
**संदर्भ :-** परिपत्रक क्र. जा.क्र. कबचौउमवि/१४/युम-३३/१२७/२०२२, दि.३१/०३/२०२२

महोदय / महोदया,

विद्यापीठ प्राधिकरण धोरणानुसार विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीबरोबरच त्यांच्या व्यक्तिगत सुप्त कला गुणांचा विकास व्हावा आणि कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ परिक्षेत्रातून प्रतिभावंत-कलावंत घडावेत **विद्यापीठ परिक्षेत्रातील सर्व विद्यार्थ्यांना सांस्कृतिक मूल्यांची जाण व्हावी असा मनोदय माननिय कुलगुरु महोदय प्रा. व्ही.एल. माहेश्वरी यांचा असतो;** यासाठी प्राथमिक स्तरावर विद्यार्थ्यांना व्यासपीठ मिळण्याकरीता दरवर्षी युवक महोत्सवाचे आयोजन करण्यात येत असते.

या अनुषंगाने विद्यापीठ संलग्न महाविद्यालये, मान्यताप्राप्त परिसंस्था व शैक्षणिक प्रशाळा-विभागातील नियमित विद्यार्थ्यांसाठी आंतर महाविद्यालयीन युवक महोत्सवाचे आयोजन विद्यार्थी विकास विभाग, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव व आयोजक महाविद्यालय **पूज्य साने गुरुजी विद्या प्रसारक मंडळाचे औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय, शहादा, जि.नंदुरबार व पूज्य साने गुरुजी विद्या प्रसारक मंडळाचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, शहादा, जि.नंदुरबार** यांच्या संयुक्त विद्यमाने **दि.19 ते 23 एप्रिल, 2022** या कालावधी मध्ये **स्वातंत्र्यांचा अमृत महोत्सव या विशेष संकल्पनेवर** करण्यात येत आहे असे संदर्भीय परिपत्रकांन्वये कळविण्यात आलेले होते.

युवक महोत्सव आयोजन समितीची सभा मंगळवार दि. 05.04.2022 रोजी आदणीय कुलगुरु प्रा. व्ही.एल.माहेश्वरी यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. या सभेत युवक महोत्सव आयोजन कालावधी उन्हाळयात येत असल्यामुळे **सांस्कृतिक पथसंचलन** रद्द करण्यात यावे, **खुल्या रंगमंचावरील स्पर्धा हया स.7.00 ते 12.00 व सां.4.00 ते रात्री उशिरा पर्यत किंवा स्पर्धेचा अंतिम स्पर्धक आपली कला सादर करे पर्यत चालतील** तर **बंदिस्त रंगमंचावरील स्पर्धेच्या वेळेत कोणताही बदल करण्यात आलेला नाही याची नोंद घ्यावी.**

तरी आपणास कळविण्यात येते की, आंतर महाविद्यालयीन युवक महोत्सवामध्ये विविध कला प्रकार सादरीकरणाचे **सुधारीत वेळापत्रक** या पत्रासोबत देत आहोत. कृपया, परिपत्रकातील सुचना व सुधारीत वेळापत्रक संबंधितांना अवगत करावे, ही विनंती.

आपला विश्वासू,

(डॉ.सुनिल बा.कुलकर्णी)
**संचालक, विद्यार्थी विकास (अ.का.)**

**सोबत :-** सुधारित वेळापत्रक

**प्रत -**

1) विभागप्रमुख, कुलगुरु कार्यालय, कबचौउमवि, जळगाव
2) विभागप्रमुख, प्र-कुलगुरु कार्यालय, कबचौउमवि, जळगाव
3) विभागप्रमुख, कुलसचिव, कार्यालय, कबचौउमवि, जळगाव
4) विभागप्रमुख, वित्त विभाग, कबचौउमवि, जळगाव
5) जनसंपर्क अधिकारी, कबचौउमवि, जळगाव - कृपया, सदर पत्रकास वृत्तपत्र, आकाशवाणी, दुरचित्रवाणी व उत्तमविद्याअंकात प्रसिध्दी दयावी.
6) पध्दती विश्लेषक, संगणकशास्त्र प्रशाळा, कबचौउमवि, जळगाव - कृपया, पत्रकास विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्दी दयावी.

## कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

## आंतर महाविद्यालय युवक महोत्सव युवारंग 2021 — कालावधी दि. 19 ते 23 एप्रिल, 2022

### स्थळ - पू. सा. गु. वि. प्र. मंडळाचे औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय (विद्याश्रम परिसर), शहादा, जि. नंदुरबार

| दिनांक | वेळ | युवक महोत्सव युवारंग 2021चे सुधारीत वेळापत्रक (Youth Festival 2021 Revised Time Table) |
|---|---|---|
| 19/04/2022 मंगळवार | स.10.00 ते सां. 7.00 वा. | संघाचे आगमन व नोंदणी |
| | रात्री 8.00 वा. | संघव्यवस्थापकांची सभा :- भारतरत्न डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम सभागृह (ICT Hall) (सर्व संघव्यवस्थापकांची सभा रोज 8.00 वा. होईल) |

| उद्घाटन दि.20/04/2022 रोजी सकाळी 8.00 वाजता विद्यापीठाचे मा.कुलगुरु प्रा. व्ही.एल.माहेश्वरी यांच्या हस्ते होईल. | | *खुले* रंगमंच क्र. 1 स्वातंत्र्य सेनानी अण्णासाहेब पी.के. पाटील रंगमंच | *बंदिस्त* रंगमंच क्र. 2 बालहुतात्मा शिरीषकुमार रंगमंच (महात्मा गांधी सभागृह) | *बंदिस्त* रंगमंच क्र. 3 हुतात्मा लालदास शहा रंगमंच (गुरुवर्य सी.डी.शहा सभागृह) | *बंदिस्त* रंगमंच क्र. 4 वीर भगतसिंग रंगमंच (सर विश्वेश्वरैय्या सभागृह) | *बंदिस्त* रंगमंच क्र. 5 वीर बिरसामुंडा रंगमंच |
|---|---|---|---|---|---|---|
| 20/04/2022 बुधवार | स.9.00 वा. | मिमिक्री (Mimicry) | उद्घाटन समारंभासाठी सर्वांनी रंगमंच क्र. 1 वर उपस्थित रहावे. | | | |
| | *दु. 2.00 वा. | विडंबननाट्य (Skits) *(सां.4.00 वा) | भारतीय लोकगीत (Indian Folk Song) | काव्यवाचन (Poetry) | शास्त्रीय वादन (सुरवाद्य) (Classcial Instrument- NP) | रांगोळी (Rangoli) |
| | | | भारतीय लोकगीत (Indian Folk Song) | काव्यवाचन (Poetry) | शास्त्रीय वादन (तालवाद्य) (Classcial Instrument- NP) | व्यंगचित्र (Cartooning) |
| 21/04/2022 गुरुवार | स. 7.00 वा. | विडंबननाट्य (Skits) | सुगम गायन (पा.) (Light Vocal Solo) (W) | वादविवाद (Debate) | सुगम गायन (भारतीय) (Light Vocal Solo Indian) | कोलाज (Collage) |
| | *स.11.30 वा. | मुकनाट्य (Mime) *(सां.4.00 वा) | समुहगीत (पा.) (Group Song) (W) | वादविवाद (Debate) | सुगम गायन (भारतीय) (Light Vocal Solo Indian) | क्ले मॉडेलिंग (Clay Modeling) |
| | *दु.1.00 वा. | | समुह गीत (भा.) (Group Song) (I) | | शास्त्रीयगायन (Classical Song) | स्पॉट पेटींग (Spot Painting) |
| 22/04/2022 शुक्रवार | स.7.00 वा. | समुह लोकनृत्य (Group Dance) *(सां.4.00 वा) | शास्त्रीय नृत्य (Classical Dance) | वक्तृत्व (Elocution) | फोटोग्राफी (प्र.फेरी) (Photography) | चित्रकला (Poster Making) |
| | *दु.2.00 वा. | | लोकसंगीत (Folk Orchestra) | वक्तृत्व (Elocution) | फोटोग्राफी (अं.फेरी) (Photography) | इनस्टॉलेशन (Install.) मेहेंदी (Mehandi) |
| 23/04/2022 शनिवार | स. 10.00 वा. | रंगमंच क्र. 1 :- पारितोषिक वितरण आणि समारोप सोहळा | | | | |

- ❖ **महोत्सव आयोजन काळात उन्हाळा असल्याने खुल्या रंगमंचावरील स्पर्धा हया स.7.00 ते 12.00 व सां.4.00 ते रात्री उशिरा पर्यत किंवा स्पर्धेचा अंतिम स्पर्धक आपली कला सादर करे पर्यत चालतील.**
- ❖ **बंदिस्त रंगमंचावरील स्पर्धेच्या वेळेत कोणताही बदल करण्यात आलेला नाही याची नोंद घ्यावी.**

टिप - 1) दररोज स्पर्धा सकाळी 7.00 वाजता वेळापत्रकाप्रमाणेच सुरु होतील याची संघ व्यवस्थापकांनी नोंद घ्यावी.
2) दररोज दुपारच्या भोजनाची वेळ सकाळी 12.00 ते 2.00 व रात्रीच्या भोजनाची वेळ 8.00 ते 10.00 असेल
3) रंगमंचावरील एक स्पर्धा संपल्यानंतर तात्काळ वेळापत्रकात दिल्याप्रमाणे त्या रंगमंचावरील दुसरी स्पर्धा सुरु करण्यात येईल.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| डॉ.ई. जा.पाटील | प्राचार्य,डॉ. एस.पी.पवार | प्राचार्य,डॉ. आर.एस.पाटील | डॉ. सुनिल बी.कुलकर्णी | श्री.दिपक बी.पाटील |
| **समन्वयक, युवारंग -2021** | **संयोजक प्रमुख, युवारंग -2021** | **संयोजक प्रमुख, युवारंग -2021** | **सचिव, युवारंग -2021 (संचालक,वि.वि.अ.का)** | **कार्याध्यक्ष, युवारंग 2021** |

Shahada Taluka Educational Society & Co-Operative Educational Society Ltd.

**Institute of Management Research and Development**

Shahada Dist- Nandurbar

**Dr. Jagdish J. Patil**
(M.Com.Ph.D.)
**Director**
Mo.9423435038

College Phone
02565-223122, 223532
**College Code: - 230102**

**Shri. Motilal F. Patil**
(M.Sc., Agri.)
**Chairman**

Website-www.stcimrd.ac.in

E-Mail:- stcoopimrdshahada@gmail.com

Date:-08-01-2019

# NOTICE

All the Teachers/students are here by informed that, **Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon and C.H.Chaudhari Arts, S.G.Patel Commerce & Babaji B.J.Patel Science College, Taloda** will be organizing the following program as per the given schedule.

We request the presence of all teachers and students for this important event. Your attendance is expected to be on time to ensure the smooth running of the program.

**Program Details**

Name of Program : - Yuvarang – 2018-19

Date : - 06-Feb-2019

Venue : - C.H.Chaudhari Arts, S.G.Patel Commerce & Babaji B.J.Patel Science College, Taloda

S.T.E.S. & Co-Op.E.S.Ltd. IMRD Shahada

Director

DIRECTOR
S.T.E.S. & Co-Op Edu Society Ltd.
Institute of Management
Research & Development
Shahada, Dist. Nandurbar

जा.क्र. कबचौउमवि/14/युम-33/ 361 /2019 दि.19/12/2019

# युवक महोत्सव युवारंग 2019-20

प्रति,

**मा.प्राचार्य / संचालक / विभाग प्रमुख / नियंत्रक अधिकारी**
**विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालय / मान्यताप्राप्त परिसंस्था व**
**विद्यापीठ शैक्षणिक प्रशाळा / विभाग यांना -**

**विषय :- आंतर महाविद्यालयीन युवक महोत्सव युवारंग 2019-20 बाबत....**

महोदय / महोदया,

विद्यापीठ प्राधिकरण धोरणानुसार विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीबरोबरच त्यांच्या व्यक्तिगत सुप्त कला गुणांचा विकास व्हावा आणि कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ परिक्षेत्रातून प्रतिभावंत-कलावंत घडावेत **विद्यापीठ परिक्षेत्रातील सर्व विद्यार्थ्यांना सांस्कृतिक मूल्यांची जाण व्हावी असा मनोदय माननिय कुलगुरु महोदय प्रा. पी. पी. पाटील यांचा असतो;** यासाठी प्राथमिक स्तरावर विद्यार्थ्यांना व्यासपीठ मिळण्याकरीता दरवर्षी युवक महोत्सवाचे आयोजन करण्यात येत असते.

या अनुषंगाने विद्यापीठ संलग्न महाविद्यालये, मान्यताप्राप्त परिसंस्था व शैक्षणिक प्रशाळा-विभागातील नियमित विद्यार्थ्यांसाठी आंतर महाविद्यालयीन युवक महोत्सवाचे आयोजन विद्यार्थी विकास विभाग, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव व आयोजक महाविद्यालय **पूज्य साने गुरुजी विद्या प्रसारक मंडळाचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, शहादा, जि.नंदुरबार** यांच्या संयुक्त विद्यमाने **दि.16 ते 20 जानेवारी, 2020** या कालावधी मध्ये करण्यात येत आहे.

आपणास विनंती करण्यात येते की, आंतर महाविद्यालयीन युवक महोत्सवामध्ये विविध कला प्रकारात आपले विद्यार्थी जास्तीत-जास्त संख्येने सहभागी होण्याकरीता प्रयत्न करावेत. युवक महोत्सवात सहभागी होणाऱ्या स्पर्धकांना व कला मंडळाच्या प्रमुखांना या परिपत्रकासोबत दिलेली स्पर्धा नियमावली व माहिती निर्दशनास आणून द्यावी. आपल्या तज्ञ प्राध्यापकांच्या सहकार्याने स्पर्धकांची चांगली तयारी करुन स्पर्धेतील विविध कला प्रकारांमध्ये आपला संघ **सहभागी होणे अनिवार्य आहे.**

**युवक महोत्सव नियमावली व माहितीपत्रकासंदर्भात विद्यापीठाच्या वेबसाईटवर भेट द्यावी. विद्यापीठाची वेबसाईट www.nmu.ac.in यावरील Portal Pogin ला Click करुन युवारंग लिंक दि. 21 डिसेंबर, 2019 ते 6 जानेवारी, 2020 या दरम्यान उपलब्ध असून यात स्पर्धक, साथसंगीतदार आणि संघ व्यवस्थापक यांची माहिती भरणे अनिवार्य आहे. तसेच विविध शुल्क, नोंदणी, प्रवेश, भोजन आदि ई-पेमेंट (NEFT) द्वारे आयोजकांच्या बँक खाती जमा करावेत, सदर बँक खात्याचा तपशिल पेज क्र.12 वर नमुद आहे.**

ऑन लाईन नोंदणी झाल्यावर महाविद्यालयाने भरलेल्या माहितीची पुष्टी करण्यासाठी verification copy download करुन घ्याव्यी. महाविद्यालयाकडून भरलेल्या माहितीची पुष्टी झाल्यावर Confirm Application ला click करावे. महाविद्यालयाकडून एकदा Confirmed झालेल्या Application मधील माहितीत पुन्हा बदल करता येणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी. Confirm Application झाल्यावर Download Final Copy of Application ला Click करुन आयोजक महाविद्यालयाला पाठवावयाची संघ नोंदणीची प्रत Download करावी. सदर प्रतीवर विद्यार्थी व मा.प्राचार्य यांची स्वाक्षरी घेऊन **दि.07 जानेवारी, 2020, सायंकाळी 05.00 वाजेपर्यंत आयोजक महाविद्यालयास सादर करणे अनिवार्य राहील.**

त्याचप्रमाणे सोबत NEFT ची प्रत देखील पाठवावी. विद्यार्थी व संघ व्यवस्थापक यांचा नजीकच्या काळातील एक फोटो System generated form वर लावावा. तसेच सर्व System generated forms ची छायांकित प्रत व ई-पेमेंट केल्याची एक प्रत संघ व्यवस्थापकांनी आपल्या सोबत ठेवणे आवश्यक आहे.

कळावे,

आयोजक महाविद्यालय संपर्क:-
**डॉ. एम. के. पटेल**
**समन्वयक, आंतर महाविद्यालयीन युवक महोत्सव युवारंग 2019-20**
पू. सा. गु. वि. प्र. मंडळाचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,
शहादा, जि.नंदुरबार
भ्र. क्रमांक - 94218 88176
इमेल आयडी - yuvarang2019@gmail.com

आपला विश्वासू,

(डॉ. सत्यजित साळवे)
**संचालक, विद्यार्थी विकास**

**सोबत :-** सूचना, नियमावली व माहितीपत्रक

**प्रत माहितीसाठी -**

1) विभागप्रमुख, कुलगुरु कार्यालय, कबचौउमवि, जळगाव
2) सहा. कुलसचिव, प्र-कुलगुरु कार्यालय, कबचौउमवि, जळगाव
3) मा.कुलसचिव, कार्यालय, कबचौउमवि, जळगाव
4) मा.वित्त व लेखा अधिकारी, कबचौउमवि, जळगाव
5) मा. विभागप्रमुख, उत्तमविद्या अंक, जनसंवाद व पत्रकारीता विभाग, कबचौउमवि, जळगाव
6) मा. जनसंपर्क अधिकारी, कबचौउमवि, जळगाव - कृपया वृत्तपत्रात प्रसिध्दी दयावी.
7) मा.पध्दती विश्लेषक संगणक केंद्र, संगणक प्रशाळा, कबचौउमवि, जळगाव - कृपया पत्रकास विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्दी दयावी.

**टिप :- Online system शी संबधित माहिती Portal Login मध्ये PDF स्वरुपात उपलब्ध आहे. नोंदणी करण्यास अडचण आल्यास कृपया 0257-2258411 यानंबरवर विद्यापीठ कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा.**

*D:\\VBOXSVR\xp_data\RMB\Yuvak Mahotsav 2019-2020.docx*

## ♦ आंतर महाविद्यालयीन युवक महोत्सव युवारंग 2019-20 ♦

*** महाविद्यालय, परिसंस्था व शैक्षणिक प्रशाळा-विभाग यांना महत्वाच्या सूचना :-**

1) प्रत्येक महाविद्यालयाच्या संघा सोबत दोन **पूर्ण वेळ मान्यताप्राप्त** संघ व्यवस्थापक संपूर्ण युवक महोत्सव कालावधीसाठी पाठवावे, त्यामध्ये 1 पुरुष व 1 महिला असणे आवश्यक आहे. स्पर्धक संख्या 30 किंवा त्यापेक्षा जास्त असल्यास 3 संघ व्यवस्थापक पाठवू शकतात, त्यांनी महाविद्यालयाचे ओळखपत्र बाळगणे आवश्यक राहील. (तासिका तत्वावरील किंवा कंत्राटी शिक्षक संघ व्यवस्थापक म्हणून पाठवू नये.)
2) संघ व्यवस्थापकांची सभा महोत्सवाच्या आदल्या दिवशी सायंकाळी 7.30 वाजता कार्यक्रम स्थळी घेण्यात येईल. सभेस संघ व्यवस्थापक उपस्थित राहाणे आवश्यक आहे.
3) संघ व्यवस्थापकांनी संघासोबत थांबणे सक्तीचे आहे व त्यांनी आपआपल्या विद्यार्थ्यांसोबत परिसरात जास्तीत-जास्त काळ थांबावे.
4) कोणत्याही कला प्रकारासाठी वादन साहित्य, इतर साहित्य, स्पर्धक संघाने स्वत: आणावयाचे आहे.
5) महोत्सवात सहभागी होणाऱ्या संघाची कला प्रकार निहाय नोंदणी परिपत्रकात नमूद केल्याप्रमाणे करावी. उशिरा आलेल्या संघाची नोंदणी करण्यात येणार नाही, याची संघ व्यवस्थापकांनी नोंद घ्यावी.
6) युवक महोत्सवासाठी विद्यार्थी निवड करतांना सदरचा विद्यार्थी पदवी / पदवीव्युत्तर वर्गात नियमित प्रवेश घेणारा असावा. **पदविका व सहामाही / एक वर्षाच्या प्रमाणपत्र अभ्यासक्रमाला प्रवेशित विद्यार्थ्यांची निवड करु नये.** त्यांचेकडे शैक्षणिक वर्ष 2019-20 मधील ओळखपत्र असावे त्यावर मा.प्राचार्य/ संचालक/ विभागप्रमुख/ ग्रंथपाल याची स्वाक्षरी असावी.
7) युवक महोत्सवासाठी निवड झालेला विद्यार्थी हा नियमित प्रवेशित, ओळखपत्रधारक, वय, वयोमर्यादा व त्याची शैक्षणिक अर्हता याबाबत खात्री करुन पात्र विद्यार्थी युवक महोत्सवा मध्ये पाठविण्याची जबाबदारी संघव्यवस्थापक, विद्यार्थी विकास अधिकारी, प्राचार्य/ संचालक/ विभागप्रमुख यांची राहील. याबाबत अनियमितता आढळल्यास मा. कुलगुरु महोदय, मा.विद्यापीठ व्यवस्थापन परिषद व विद्यापीठ विकास मंडळ यांच्या निर्णयानुसार कारवाई करण्यात येईल.
8) कार्यक्रम स्थळी विद्यार्थ्यांनी कोणतेही लिखाण, तोडफोड अथवा घाण करु नये, अशी ताकीद संघ व्यवस्थापकांनी विद्यार्थ्यांना द्यावी. पालन न झाल्यास योग्य ती कारवाई करण्यात येईल.
9) संघ व्यवस्थापकांनी कोणत्याही कारणाने परीक्षकांना भेटू नये. तसेच स्पर्धकांसोबत थांबणे आवश्यक आहे. संघ व्यवस्थापकांनी स्पर्धकास नातेवाईक अथवा मित्र यांच्याकडे जाण्यास परवानगी देऊ नये.
10) स्पर्धक महाविद्यालयास निश्चित केलेल्या क्रमवारीनुसार सादरीकरण करणे बंधनकारक राहील.
11) संघ व्यवस्थापकांच्या सभेत वक्तृत्व व वादविवाद स्पर्धांचे विषय जाहीर केले जातील.
12) परीक्षकांचा निर्णय अंतिम राहील व तो सर्वांवर बंधनकारक राहील.
13) **कला प्रकार सादरीकरणामध्ये अश्लिल शब्दाचा वापर करु नये.** अन्यथा त्या कला प्रकाराचे सादरीकरण त्याच क्षणी रद्द करण्याचा अधिकार परीक्षकांना आहे.
14) संघ व्यवस्थापकांनी आपल्या महाविद्यालयाचे काही लेटर हेड सोबत ठेवावे. कोणतीही तक्रार लेटर हेड शिवाय स्वीकारली जाणार नाही.
15) सामुहिक कला प्रकारात संघ मुलांचा अथवा मुलींचा अथवा मुलांमुलींचा असला तरी चालेल.
16) **कोणत्याही स्पर्धकाचे वय दि.31 डिसेंबर, 2019 रोजी 25 वर्षा पेक्षा जास्त नसावे** याची पडताळणी केल्यावरच स्पर्धकाला महोत्सवात पाठवावे.
17) **एका स्पर्धकास जास्तीत-जास्त तीन (3) उपकला प्रकारात सहभागी होता येईल व ललित कला प्रकारातील स्पर्धेत जास्तीत जास्त दोन (2) उपकलाप्रकारात सहभाग घेता येईल.** यापेक्षा जास्तीचा सहभाग आढळून आल्यास त्याचा सर्व कला प्रकारातील सहभाग रद्द करण्यात येईल.
18) महोत्सव संबंधी कोणताही निर्णय घेण्याचा, कार्यक्रमात बदल करण्याचा अधिकार युवक महोत्सव आयोजन समितीने राखून ठेवला आहे.

19) स्पर्धकाच्या प्रवेश अर्जावरील छायाचित्र तसेच जन्म तारखेचा दाखला (L.C./T.C.) मा. प्राचार्य/ संचालक / विभाग प्रमुख यांनी साक्षांकीत केलेले असावे. नसल्यास सदर विद्यार्थ्याचा त्या कला प्रकारातील सहभाग रद्द करण्यात येईल.

20) पार्श्वसंगीतासाठी व्यावसायिक संगीत साथीदारांना परवानगी राहील. त्याकरीता प्रवेशिकेत नमूद करणे आवश्यक राहील.

21) अ) युवक महोत्सवात प्रत्येक महाविद्यालयाने आपला सहभाग नोंदवावा विद्यापीठ संलग्न प्रत्येक महाविद्यालयाने युवक महोत्सव शुल्क रु. 600/- NEFT द्वारे यजमानांकडे जमा करणे आवश्यक आहे.
ब) सहभागी महाविद्यालयांकडून प्रत्येक विद्यार्थ्याकरीता रु. 120/- प्रवेश शुल्क NEFT द्वारे यजमानांकडे जमा करावे.

22) आयोजक महाविद्यालयाने स्पर्धक, संघ व्यवस्थापक व साथ-संगीतदार यांची भोजनाची व्यवस्था केली असून या व्यवस्थेकरीता प्रती व्यक्ती रु.500/- शुल्क आकारण्यात येईल, सदर शुल्क NEFT द्वारे यजमानांकडे जमा करावे.

23) **प्रत्येक महाविद्यालयाने युवक महोत्सवात सहभागी होणे अनिवार्य आहे. (पाच मुख्य कलाप्रकारातील किमान एका उपकला प्रकारात सहभागी होणे बंधनकारक आहे.) ज्या महाविद्यालयाचा युवक महोत्सवात सहभाग नसेल त्यांच्यावर प्राधिकरणाच्या निर्णयानुसार कडक कारवाई करण्यात येईल, याची महाविद्यालयांनी नोंद घ्यावी.**

24) एका महाविद्यालयाच्या संघात जास्तीत-जास्त 42 स्पर्धक विद्यार्थी, 2 संघव्यवस्थापक व 6 संगीत साथीदार किंवा सहकारी असे एकूण जास्तीत-जास्त 50 व्यक्ती सहभागी असतील.

25) युवक महोत्सव वेळापत्रकात प्रसंग व आवश्यकतेनुसार वेळोवेळी बदल करण्याचे अधिकार युवक महोत्सव युवारंग 2019-20 आयोजन समितीस राहतील.

26) महाविद्यालयाने युवक महोत्सवात सादर केलेल्या कला प्रकाराची मुळ संहिता वापरण्याविषयी लेखक / कलावंत यांची लेखी संमती घेणे आवश्यक राहील व त्याची प्रमाणित छायांकित प्रत प्रवेशिकेसोबत सादर करणे आणि त्याची एक प्रत संघ व्यवस्थापकाने बाळगणे अनिवार्य राहील.

27) विजेत्या महाविद्यालयाचे गायनातील गीत, विडंबन नाट्य, मुक नाट्य, लोक संगीत आदी कला प्रकारातील संहिता (स्क्रीप्ट) वेगवेगळ्या स्पर्धांमध्ये वापरण्याचा हक्क विद्यापीठाचा राहील.

**आंतर महाविद्यालयीन युवक महोत्सव ही स्पर्धा असल्यामुळे कोणत्याही संघ / स्पर्धका बाबत आक्षेप असल्यास स्पर्धा संपल्यानंतर एका तासाच्या आंत तक्रारीची नोंद घेतली जाईल. तद्नंतर मात्र आपली कोणतीही तक्रार / आक्षेप विचारात घेतली जाणार नाही व त्यांस कुठेही आव्हान देता येणार नाही, याची संघ व्यवस्थापकांनी नोंद घ्यावी. संघ व्यवस्थापकांच्या व्यतिरिक्त आक्षेप / तक्रार नोंदविता येणार नाही, याची महाविद्यालयांनी नोंद घ्यावी.**

**तक्रार नोंदवितांना संघ व्यवस्थापकाने रु.1000/- मात्र अनामत शुल्क आयोजकांकडे जमा करावे. तक्रार / आक्षेप यांत वैधता / सत्यता आढळल्यानंतरच आपली अनामत रक्कम आपणांस परत करण्यात येईल**

*** स्पर्धक विद्यार्थ्यांना महत्वाच्या सूचना :-**

1) प्रत्येक विद्यार्थ्याने युवक महोत्सव नियमांचे, संघ व्यवस्थापकांच्या सूचनांचे पालन करावे, निवासस्थानी, स्पर्धा परिसरात, प्रत्यक्ष स्पर्धेच्या वेळी शांतता ठेवावी.

2) प्रत्येक स्पर्धकाने आपले ओळखपत्र सोबत ठेवावे. तसेच युवक महोत्सवाचे ओळखपत्र दिसेल अशा ठिकाणी कायम स्वरुपी लावणे आवश्यक आहे.

3) कोणत्याही स्पर्धकाने तक्रारीसाठी संचालक, अध्यक्ष-संयोजन समिती, आयोजन समिती, व्यवस्थापन समिती सदस्यांना परस्पर भेटू नये. तक्रार असल्यास संघ व्यवस्थापकांमार्फत पाठवावी.

4) विद्यार्थ्यांनी रात्री 09.00 नंतर आपापल्या निवास स्थानाकडे जावे, इतरत्र थांबू नये.

5) स्पर्धकांनी परिसर स्वच्छ ठेवण्यासाठी मदत करावी. आपणच परिसरात राहणार आहोत, याची जाणीव ठेवावी.
6) स्पर्धेच्या ठिकाणी असलेल्या खुर्च्यांवर स्पर्धकांनी बसू नये.
7) वरील नियमभंग करणाऱ्या विद्यार्थ्यांवर कडक कारवाई करण्यात येईल व त्याचा परीणाम संघाच्या एकूण कामगिरीवर होईल, याची नोंद घ्यावी.

*** सर्वसाधारण विजेतेपद :-**

युवक महोत्सवात सहभागी सर्व संघांमधून प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाचे सर्व साधारण विजेते म्हणून घोषित करण्यात येईल. सर्वसाधारण विजेतेपदाची निवड करतांना पूढील निकष असतील.

1) संघाचा जास्तीत-जास्त कला प्रकारात सहभाग असणे आवश्यक असेल.
2) संघाने व व्यवस्थापकाने शिस्तीचे पालन, वेळेचे पालन व नियमांचे पालन करणे आवश्यक असेल.
3) संघाने जास्तीत-जास्त स्पर्धांमध्ये पारितोषिकसंख्या प्राप्त करणे आवश्यक असेल.
4) सर्वसाधारण विजेतेपदासाठी गुण विभागणी तक्त्यानुसार गुण दिले जातील.

- सर्व साधारण विजेता करीता **डॉ. जी. डी. बेंडाळे स्मृतीचषक** प्रदान करण्यात येईल. प्रथम क्रमांकाचा चषक हा फिरता राहील, याची नोंद घ्यावी.
- सर्व साधारण उपविजेता करीता **कै. कुसुमताई मधुकरराव चौधरी स्मृतीचषक** प्रदान करण्यात येईल. द्वितीय क्रमांकाचा चषक हा फिरता राहील, याची नोंद घ्यावी.

❖ युवक महोत्सवाचे उद्‌घाटन झाल्यानंतर प्रत्यक्ष स्पर्धेपूर्वी महाविद्यालय विद्यार्थी हे स्पर्धक विद्यार्थ्यांना पुढीलप्रमाणे प्रतिज्ञा देतील.

**♦ प्रतिज्ञा ♦**

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील आम्ही सर्व विद्यार्थी विद्यार्थीनी या युवक महोत्सवामध्ये भारतीय कलेचा वारसा घेऊन स्वत:च्या कलागुणांचा विकास साधण्यासाठी सहभागी होत आहोत. आमचा सहभाग उत्कर्षमय, आनंदमय करण्यासाठी भारतीय परंपरेतील वैचारिक सामंजस्य व सहिष्णुता आम्ही आमच्या अंगी बाळगून हा युवक महोत्सव आनंदमय करु. जाती धर्मा पलिकडील सामुहिक सहजीवन, दुर्बलांची जाण, वैचारिक अधिष्ठान, त्याग भावना व प्रसंगी न्याय भूमिकेसाठी संघर्ष करण्याची तयारी यातूनच राष्ट्र निर्माण होत असते. याची आम्हास जाणीव आहे. आमच्या उदात्त, उदार सांस्कृतिक परंपरेला साक्षी ठेवून बुध्दीनिष्ठ व विवेकनिष्ठ जीवन जगण्यासाठी कटीबध्द होणे हे आम्ही आमचे कर्तव्य समजतो. युवक महोत्सवातून उपरोक्त सर्व बाबी आमच्यामध्ये विकसित व्हाव्यात यासाठी हा युवक महोत्सव संपूर्णत: शांततेत आणि आनंदात पूर्ण करण्याची आम्ही प्रतिज्ञा करीत आहोत.

**♦ आंतर महाविद्यालयीन युवक महोत्सव युवारंग 2019-20 कलाप्रकार अटी व नियम ♦**

**❖ सांस्कृतिक पथसंचलन**

1) प्रत्येक सहभागी महाविद्यालय / मान्यताप्राप्त परिसंस्था / प्रशाळा यांचा संपूर्ण संघाचा पथसंचालनात सहभाग अनिवार्य आहे.
2) देशाची तरुणाई आणि समाज यांचे एक मनोज्ञ दर्शन पथसंचलनातून घडते.
3) नाविण्यपूर्ण कल्पनांचा आविष्कार पथसंचलनातून अपेक्षित आहे.
4) समाज स्वास्थ अबाधित राहील याचा विचार करुन पथसंचलनाची 'थीम' निवडावी.
5) सादरीकरणाचा कालावधी पथसंचलनाचा प्रारंभ ते शेवट असा राहील.

### 1) संगीत (Music)

#### अ) शास्त्रीय गायन (हिंदुस्तानी अथवा कर्नाटकी) (Classical Song)

1) स्पर्धेत एका महाविद्यालयाचा एक स्पर्धक भाग घेऊ शकेल.
2) रंगमंचावर येणे, संगीत साहित्य लावणे इ. पूर्व तयारीसाठी 2 मिनिटे दिली जातील.
3) संगीत साथीदारांची संख्या जास्तीत-जास्त तीन असावी व त्यात भारतीय वाद्यांचाच समावेश असावा.
4) सादरीकरण हिंदुस्तानी अथवा कर्नाटकी पध्दतीनेच असावे.
5) सिनेगीतांना या कलाप्रकारात सादरीकरणासाठी परवानगी नाही.
6) सादरीकरण गुणवत्ता, ताल, रागाची निवड, संगीत साथ व एकूण परिणाम यानुसार स्पर्धकास गुण दिले जातील.
7) सादरीकरणासाठी जास्तीत-जास्त 10 मिनिटे दिले जातील.

#### ब) शास्त्रीय वादन (ताल वाद्य) (Classical Instrument-P)

1) स्पर्धेत एका महाविद्यालयाचा एक स्पर्धक भाग घेऊ शकेल.
2) रंगमंचावर येणे, संगीत साहित्य लावणे इ. पूर्व तयारीसाठी 2 मिनिटे दिली जातील.
3) संगीत साथीदारांची संख्या जास्तीत-जास्त दोन असावी.
4) सादरीकरण हिंदुस्तानी अथवा कर्नाटकी पध्दतीनेच असावे.
5) सिनेगीतांना या कलाप्रकारात सादरीकरणासाठी परवानगी नाही.
6) सादरीकरण गुणवत्ता, ताल, रागाची निवड, संगीत साथ व एकूण परिणाम यानुसार स्पर्धकास गुण दिले जातील.
7) सादरीकरणासाठी जास्तीत-जास्त 8 मिनिटे दिले जातील.

#### क) शास्त्रीय वादन (सुर वाद्य) (Classical Instrument-NP)

1) स्पर्धेत एका महाविद्यालयाचा एक स्पर्धक भाग घेऊ शकेल.
2) रंगमंचावर येणे, संगीत साहित्य लावणे इ. पूर्व तयारीसाठी 2 मिनिटे दिली जातील.
3) संगीत साथीदारांची संख्या जास्तीत-जास्त दोन असावी.
4) सादरीकरण हिंदुस्तानी अथवा कर्नाटकी पध्दतीनेच असावे.
5) सिनेगीतांना या कलाप्रकारात सादरीकरणासाठी परवानगी नाही.
6) सादरीकरण गुणवत्ता, ताल, रागाची निवड, संगीत साथ व एकूण परिणाम यानुसार स्पर्धकास गुण दिले जातील.
7) सादरीकरणासाठी जास्तीत-जास्त 8 मिनिटे दिले जातील.
8) या कलाप्रकारात कॅसिओ वापरता येणार नाही.

#### ड) सुगम गायन (भारतीय) (Light Vocal Solo Indian)

1) स्पर्धेत एका महाविद्यालयाचा एक स्पर्धक भाग घेऊ शकेल.
2) रंगमंचावर येणे, संगीत साहित्य लावणे इ. पूर्व तयारीसाठी 2 मिनिटे दिली जातील.
3) संगीत साथीदारांची संख्या जास्तीत-जास्त दोन असावी.
4) या कलाप्रकारात भावगीत, भजन, गझल, अभंग सादर करता येईल.
5) चित्रपटातील भावगीतांना या कलाप्रकारात सादरीकरणासाठी परवानगी नाही.
6) सादरीकरण गुणवत्ता, ताल, रागाची निवड, संगीत साथ व एकूण परिणाम यानुसार स्पर्धकास गुण दिले जातील.
7) सादरीकरणासाठी जास्तीत-जास्त 5 मिनिटे दिले जातील.

### इ) सुगम गायन (पाश्चिमात्य) (Light Vocal Solo Western)

1) स्पर्धेत एका महाविद्यालयाचा एक स्पर्धक भाग घेऊ शकेल.
2) रंगमंचावर येणे, संगीत साहित्य लावणे इ. पूर्व तयारीसाठी 2 मिनिटे दिली जातील.
3) संगीत साथीदारांची संख्या जास्तीत-जास्त दोन असावी
4) या कलाप्रकारात सादरीकरण फक्त इंग्रजी मधून करता येईल.
5) सिनेगीतांना या कलाप्रकारात सादरीकरणासाठी परवानगी नाही.
6) सादरीकरण गुणवत्ता, ताल, रागाची निवड, संगीत साथ व एकूण परिणाम यानुसार स्पर्धकास गुण दिले जातील.
7) सादरीकरणासाठी जास्तीत-जास्त 5 मिनिटे दिले जातील.

### फ) समुह गीत (भारतीय) (Group Song Indian)

1) स्पर्धेत एका महाविद्यालयाच्या एका संघास भाग घेता येईल.
2) सदर संघास दोन समुह गीते लागोपाठ सादर करावे लागतील त्यापैकी देशभक्तीपर व दुसरे पारंपारिक लोकगीत असावे.
3) रंगमंचावर येणे, संगीत साहित्य लावणे इ. पूर्व तयारीसाठी 2 मिनिटे दिली जातील.
4) संगीत साथीदारांची संख्या जास्तीत-जास्त तीन व स्पर्धक संख्या सहा असावी.
5) सिनेगीतांना या कलाप्रकारात सादरीकरणासाठी परवानगी नाही.
6) सादरीकरण गुणवत्ता, सुर-ताल, गाण्याची निवड, सांघीक एकता, संगीत साथ व एकूण
7) परिणाम यानुसार स्पर्धकास गुण दिले जातील.
8) सादरीकरणासाठी जास्तीत-जास्त 8 मिनिटे दिले जातील.
9) या कलाप्रकारात देशभक्तीपर गीत हिंदी अथवा मराठी भाषेतून सादर करता येईल.

### ग) समुह गीत (पाश्चिमात्य) (Group Song Western)

1) स्पर्धेत एका महाविद्यालयाच्या एका संघास भाग घेता येईल.
2) सदर संघास एकच समूह गीत सादर करावे लागेल व ते इंग्रजी भाषेमधून असेल.
3) रंगमंचावर येणे, संगीत साहित्य लावणे इ. पूर्व तयारीसाठी 2 मिनिटे दिली जातील.
4) संगीत साथीदारांची संख्या जास्तीत-जास्त तीन व स्पर्धक संख्या सहा असावी.
5) सिनेगीतांना या कलाप्रकारात सादरीकरणासाठी परवानगी नाही.
6) सादरीकरण गुणवत्ता, सुर-ताल, गाण्याची निवड, संगीत साथ व एकूण परिणाम यानुसार स्पर्धकास गुण दिले जातील.
7) सादरीकरणासाठी जास्तीत-जास्त 4 मिनिटे दिले जातील.

### घ ) लोक संगीत (Folk Orchestra)

1) स्पर्धेत एका महाविद्यालयाच्या एका संघास भाग घेता येईल.
2) सदर संघास पारंपारीक लोक संगीतावर आधारीत पारंपारीक वाद्याच्या सहाय्याने सादरीकरण करावे लागेल.
3) रंगमंचावर येणे, संगीत साहित्य लावणे इ. पूर्वतयारीसाठी 2 मिनिटे दिली जातील.
4) सदर स्पर्धेत जास्तीत-जास्त स्पर्धक संख्या सहा असावी व सर्व स्पर्धक विद्यार्थी असणे आवश्यक आहे.
5) पारंपारिक वाद्य त्यांची नावे सादरीकरणाची पार्श्वभूमि व्यक्त करणारे निवेदन तीन प्रतीत
6) स्पर्धेपूर्वी सादर करणे बंधनकारक राहील.
7) सादरीकरण गुणवत्ता, सुर-ताल, गाण्याची निवड, संगीत साथ, सांघीक एकता व एकूण परिणाम
8) यानुसार स्पर्धकास गुण दिले जातील.
9) सादरीकरणासाठी जास्तीत जास्त 5 मिनिटे दिले जातील.

**च) भारतीय लोकगीत (Indian Folk Song)**

1) स्पर्धेत एका महाविद्यालयाच्या एका स्पर्धकास भाग घेता येईल.
2) सदर स्पर्धेत जोगवा, पाळणा, गवळण, ठुमरी, लावणी, भारुड इ. प्रकार सादर करता येतील.
3) रंगमंचावर येणे, संगीत साहित्य लावणे इ. पूर्वतयारीसाठी 2 मिनिटे दिली जातील.
4) सदर स्पर्धेत संगीत साथीदारांची संख्या जास्तीत जास्त तीन असावी.
5) चित्रपटातील कोणत्याही प्रकारचे गीत या प्रकारात सादर करता येणार नाही.
6) सादरीकरण गुणवत्ता, सुर-ताल, गाण्याची निवड, संगीत साथ, सांघीक एकता व एकूण परिणाम यानुसार स्पर्धकास गुण दिले जातील.
7) सादरीकरणासाठी जास्तीत-जास्त 5 मिनिटे वेळ दिला जाईल.

**2) <u>नृत्य</u> (Dance)**

**अ) समुह लोक नृत्य (Group Dance)**

1) स्पर्धेत एका महाविद्यालयाच्या एका संघास भाग घेता येईल.
2) संघास लोकनृत्यात पारंपारिक लोक कलेवर आधारीत अथवा प्रादेशिक लोकनृत्य सादर करता येईल. तसेच प्रवेशासोबत व स्पर्धा स्थळी नृत्यांची पार्श्वभूमी प्रकट करणारे लेखी निवेदन सादर करावे लागेल.
3) रंगमंचावर येणे, संगीत साहित्य लावणे इ. पूर्व तयारीसाठी 2 मिनिटे दिली जातील.
4) संगीत साथीदारांची संख्या जास्तीत-जास्त तीन व स्पर्धक संख्या आठ असावी.
5) सिनेगीतांना या कलाप्रकारात सादरीकरणासाठी परवानगी नाही.
6) सादरीकरण गुणवत्ता, ताल, गाण्याची निवड, संगीत साथ, वेशभूषा, रंगभूषा, सांघीक एकता, हावभाव व एकूण परिणाम यानुसार स्पर्धकास गुण दिले जातील.
7) सादरीकरणासाठी जास्तीत-जास्त 8 मिनिटे दिले जातील.

**ब) शास्त्रीय नृत्य (Classical Dance)**

1) स्पर्धेत एका महाविद्यालयाचा एक स्पर्धक भाग घेऊ शकेल.
2) शास्त्रीय नृत्यांची पार्श्वभूमी व वैशिष्टे प्रकट करणारे लेखी निवेदन तीन प्रतीत स्पर्धेपूर्वी संयोजकाकडे सादर करावे लागेल.
3) रंगमंचावर येणे, संगीत साहित्य लावणे इ. पूर्व तयारीसाठी 2 मिनिटे वेळ दिला जाईल व सादरीकरणासाठी 8 मिनिटे दिला जाईल.
4) शास्त्रीय नृत्यात कथ्थक, कथ्थकली, भरतनाट्यम, मणिपुरी, कुचीपुरी, ओरिसी नृत्यांचा प्रकार असावा.
5) गायक व संगीत साथीदारांची संख्या जास्तीत-जास्त तीन असावी, कॅसेट वापरण्यास सक्त मनाई आहे.
6) सिनेगीतांना या कलाप्रकारात सादरीकरणासाठी परवानगी नाही.
7) सादरीकरण गुणवत्ता, ताल, रागाची निवड, संगीत साथ, वेशभूषा, रंगभूषा, हावभाव व एकूण परिणाम यानुसार स्पर्धकास गुण दिले जातील.

**3) साहित्य कला (Literary)**

**अ) वक्तृत्व स्पर्धा (Elocution)**

1) स्पर्धेत एका महाविद्यालयाचा एक स्पर्धक भाग घेऊ शकेल.
2) स्पर्धेचे माध्यम मराठी, हिंदी अथवा इंग्रजी मान्य राहील.
3) स्पर्धकास बोलण्यासाठी एकूण 5 मिनिटे वेळ दिला जाईल.
4) वक्तृत्व स्पर्धेचा विषय संघ व्यवस्थापकांच्या बैठकीत जाहीर केला जाईल.
5) स्पर्धकास सादरीकरण हे गद्य किंवा पद्यावर आधारीत असावे व यामध्ये गीतांचा वापर करता येणार नाही.

**ब) वादविवाद स्पर्धा (Debate)**

1) स्पर्धेत महाविद्यालयाचे दोन स्पर्धक भाग घेऊ शकतील, एक प्रस्तावाच्या बाजूने तर दुसरा विरुध्द बाजू मांडेल.
2) स्पर्धेचे माध्यम मराठी, हिंदी अथवा इंग्रजी मान्य राहील.
3) स्पर्धकास बोलण्यासाठी एकूण 5 मिनिटे वेळ दिला जाईल.
4) वादविवाद स्पर्धेचा विषय संघ व्यवस्थापकांच्या बैठकीत जाहीर केला जाईल.
5) स्पर्धकास वाचून सादरीकरण करता येणार नाही.

**क) काव्य वाचन स्पर्धा (Poetry)**

1) स्पर्धेत एका महाविद्यालयाचा एक स्पर्धक भाग घेवू शकेल.
2) स्पर्धेचे माध्यम मराठी, हिंदी अथवा इंग्रजी मान्य राहील.
3) काव्य स्वरचित असल्याचे हमी पत्र नोंदणी वेळी आयोजकांकडे सादर करावे.
4) काव्य छायांकित प्रत मा.प्राचार्य/ संचालक यांनी प्रमाणित करावी व नोंदणी वेळी आयोजकांकडे सादर करावे.
5) काव्य वाचनासाठी एकूण 4 मिनीटे वेळ दिला जाईल.

**4) नाटय कला (Theatre)**

**अ) विडंबन नाटय स्पर्धा (Skits)**

1) स्पर्धेत एका महाविद्यालयाच्या एका संघास भाग घेता येईल.
2) स्पर्धेत जास्तीत-जास्त स्पर्धक सहा व साथीदार संख्या तीन असावी.
3) स्पर्धेचे माध्यम मराठी अथवा हिंदी राहील.
4) सादरीकरणासाठी एकूण 10 मिनिटे वेळ दिला जाईल.
5) नाटीकेत कोणत्याही व्यक्तीवर थेट टिका असू नये.
6) नाट्यलेखकाच्या परवानगीसह सादरीकरणाच्या तीन प्रती संयोजकांकडे निर्धारीत वेळेत सादर न केल्यास संघ बाद केला जाईल.
7) सादरीकरणाचा दर्जा, एकसंघपणा, अभिनय, नाट्य कल्पना, वेशभूषा, रंगभूषा व पार्श्वसंगीत यानुसार गुण दिले जातील.

**ब) मुक नाट्य स्पर्धा (Mime)**

1) स्पर्धेत एका महाविद्यालयाच्या एका संघास भाग घेता येईल.
2) स्पर्धेत जास्तीत-जास्त स्पर्धक सहा व साथीदार संख्या दोन असावी.
3) सादरीकरणासाठी एकूण 5 मिनिटे वेळ दिला जाईल.
4) विडंबनातून कोणत्याही व्यक्तीवर थेट टीका असू नये.
5) नाट्यलेखकाच्या परवानगीसह सादरीकरणाच्या तीन प्रती संयोजकांकडे निर्धारीत वेळेत सादर न केल्यास संघ बाद केला जाईल.
6) सादरीकरणाचा दर्जा एकसंघपणा, अभिनय, नाट्य कल्पना, वेशभूषा, रंगभूषा व पार्श्वसंगीत यानुसार गुण दिले जातील.

**क) मिमिक्री (Mimicry)**

1) स्पर्धेत एका महाविद्यालयाचा एक स्पर्धक भाग घेऊ शकेल.
2) स्पर्धेचे माध्यम मराठी अथवा हिंदी राहील.
3) सादरीकरणासाठी एकूण 5 मिनिटे कालावधी देण्यात येईल.
4) वेशभूषा, रंगभूषा व पार्श्वसंगीत यांना परवानगी आहे. परंतू कोणत्याही व्यक्तीवर थेट टीका असू नये.
5) या स्पर्धेत पशु-पक्षी, सिने कलावंत, राजकीय नेते तसेच इतर असामान्य आवाज काढता येतील.
6) ध्वनी व्यवस्थेचा वापर आवश्यकतेप्रमाणे स्पर्धकास करता येईल.
7) सादरीकरणाचा दर्जा, अभिनय, मध्यवर्ती कल्पना यानुसार गुण दिले जातील.

**5) ललित कला (Fine Arts)**

**अ) रांगोळी स्पर्धा** (Rangoli)

1) स्पर्धेत एका महाविद्यालयाचा एक स्पर्धक भाग घेऊ शकेल.
2) स्पर्धेचा कालावधी 2½ तास राहील.
3) रांगोळी व इतर साहित्य स्पर्धकाने स्वत: आणावयाचे आहे.
4) रांगोळी साठी स्पर्धेपूर्वी विषय दिला जाईल.
5) रांगोळी 2 बाय 2 फुट आकारात काढावी.

**ब) चित्रकला स्पर्धा (Poster Making)**

1) स्पर्धेत एका महाविद्यालयाचा एक स्पर्धक भाग घेऊ शकेल.
2) स्पर्धेचा कालावधी 2½ तास राहील.
3) रंग, ब्रश व इतर साहित्य स्पर्धकाने स्वत: आणावयाचे आहे. कागद स्पर्धेपूर्वी पुरविला जाईल.
4) चित्रकलेसाठी स्पर्धेपूर्वी विषय दिला जाईल.
5) प्रत्येकास 15" X 22" साईझचा कागद पुरविला जाईल.

**क) कोलाज (Collage)**

1) स्पर्धेत एका महाविद्यालयाचा एक स्पर्धक भाग घेऊ शकेल.
2) स्पर्धेचा विषय स्पर्धेपूर्वी दिला जाईल.
3) स्पर्धेचा कालावधी 2½ तास राहील.
4) स्पर्धेसाठी लागणारे आवश्यक सर्व साहित्य स्पर्धकाने आणावयाचे आहे.
5) स्पर्धेसाठी कच्चे साहित्य म्हणून मासिके व वृत्तपत्रे एवढेच मान्य राहील त्याची व्यवस्था स्पर्धकाने स्वत: करावयाची आहे.

**ड) व्यंगचित्र (Cartooning)**

1) स्पर्धेत एका महाविद्यालयाचा एक स्पर्धक भाग घेऊ शकेल.
2) स्पर्धेचा विषय स्पर्धेपूर्वी दिला जाईल.
3) स्पर्धेचा कालावधी 2½ तास राहील.
4) स्पर्धकांना 22" X 15" आकाराचा कागद दिला जाईल इतर सर्व साहित्य स्पर्धकाने स्वत: आणावयाचे आहे.

**इ) क्ले मॉडलींग (Clay Modeling)**

1) स्पर्धेत एका महाविद्यालयाचा एक स्पर्धक भाग घेऊ शकेल.
2) स्पर्धेचा कालावधी 2½ तास राहील.
3) स्पर्धेचा विषय स्पर्धेपूर्वी दिला जाईल.
4) स्पर्धेसाठी स्पर्धकाला माती संयोजकाकडून पुरविली जाईल, इतर सर्व साहित्य स्पर्धकाने स्वत: आणावयाचे आहे.

**फ) स्पॉट पेन्टीग (Spot Painting)**

1) स्पर्धेत एका महाविद्यालयाचा एक स्पर्धक भाग घेऊ शकेल.
2) स्पर्धेचा कालावधी 2½ तास राहील.
3) स्पर्धेचा विषय स्पर्धेपूर्वी दिला जाईल.
4) स्पर्धेसाठी आवश्यक सर्व साहित्य स्पर्धकाने स्वत:आणावयाचे आहे. प्रत्येकास 15" X 22" साईझचा कागद पुरविला जाईल.

**ग) फोटोग्राफी (Photography)**

1) स्पर्धेत एका महाविद्यालयाचा एक स्पर्धक भाग घेऊ शकेल.
2) स्पर्धेसाठी स्पर्धकास स्वत:चा कॅमेरा आणावा लागेल. कॅमेरा जास्तीत जास्त 16 मेगापीक्सल (Mega pixels) असावा.
3) स्पर्धेसाठी 2½ तास देण्यात येईल.
4) स्पर्धा दोन फेरी मध्ये होईल. प्राथमिक फेरीतून निवडक 10 स्पर्धकांची अंतीम फेरी होईल.
5) फोटोग्राफी काढण्यासाठी परिक्षक स्पर्धेबाबत सुचना देतील.
6) दुसऱ्या फेरीसाठी वरील प्रमाणे नियम लागू राहतील.

**घ) इन्स्टॉलेशन (Installation)**

1) स्पर्धेत एका महाविद्यालयाचा एक संघ भाग घेईल.
2) एका संघात चार स्पर्धक असतील. साथीदाराची मदत घेता येणार नाही.
3) स्पर्धेच्या वेळी दिल्या जाणाऱ्या संकल्पनेच्या (Theme) आधारावर आणि निश्चित केलेल्या परिसरात उपलब्ध असणाऱ्या टाकाऊ साहित्याचा वापर करुन कलाकृती साकारावी.
4) स्पर्धेसाठी 2½ तास देण्यात येईल.
5) कलाकृती तयार करतांना कल्पकता, सर्जनशिलता व संकल्पनेत सुसूत्रता असावी. कलाकृतीचा आकार स्पर्धेच्या वेळी निश्चित करण्यात येईल.
6) पूर्व तयार केलेल्या कोणत्याही साहित्याचा वापर करता येणार नाही.

**च) मेंहदी (Mehandi)**

1) स्पर्धेत एका महाविद्यालयाचा एक स्पर्धक व एक सहकारी भाग घेऊ शकेल.
2) स्पर्धकाने आपल्या सहकाऱ्याच्या दोन्ही हाताच्या कोपरापर्यंत मेंहदी काढावयाची आहे.
3) सहकारी हा / ही महाविद्यालयातील नियमीत प्रवेशित विद्यार्थी/विद्यार्थीनी असणे आवश्यक आहे.
4) स्पर्धेचा कालावधी 2½ तास राहील.
5) मेंहदीसाठी कोन स्पर्धकाने आणावयाचा असून इतर दुसरे कोणतेही डेकोरेटीव्ह मटेरियल आणू नये.
6) मेहंदीचे परीक्षण करतांना अस्सलता, कलात्मकता आणि सर्जनशीलता विचारात घेतली जाईल.

- **आंतर महाविद्यालयीन युवक महोत्सव 2019-20 पारितोषिक स्वरुप**
  - सर्व सहभागी विद्यार्थी स्पर्धक, संघव्यवस्थापक व महाविद्यालय यांना सहभागाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.
  - प्रथम, द्वितीय व तृतीय विजेत्या स्पर्धकांना प्रमाणपत्र, पदक व स्मृतीचिन्ह युवक महोत्सवात प्रदान करण्यात येतील.
  - स्पर्धा कला प्रकारातील साथसंगीतदार हा विद्यार्थी नसल्यास त्यास पारितोषिकाचा लाभ मिळणार नाही.
  - स्पर्धा विजेते स्पर्धक/ संघ यांचेबाबत संबंधितांच्या आक्षेप वैध ठरल्यास त्या कला प्रकारातील प्रदान करण्यात आलेले पदक, प्रमाणपत्र व स्मृतीचिन्ह परत घेण्यात येतील. तसेच संबंधित स्पर्धक व संघ महाविद्यालयावर कारवाई करण्यात येईल.

- NEFT द्वारे युवक महोत्सव नोंदणी, प्रवेश आणि अनुषंगिक व्यवस्था शुल्क ई-पध्दतीने भरण्याकरीता आयोजक महाविद्यालयाच्या बँक खात्याचा सविस्तर तपशिल खालीलप्रमाणे -

| | |
|---|---|
| **आयोजक महाविद्यालयाचे नांव** | पूज्य साने गुरुजी विद्या प्रसारक मंडळाचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, शहादा, जि.नंदुरबार |
| **Account Name** | Pracharya va Vidyarthi Vikas Kalyan P S G V M A S C Shahada |
| **Bank Address** | Shibam Complex, Mohida Road, Near State Bank of India, At Post Shahada, Dist.Nandurbar |
| **Name of Bank** | **Bank of Maharashtra** |
| **Account No.** | 60117219117 |
| **IFSC Code** | MAHB0001488 |
| **Account Type** | **Saving** |

(डॉ. सत्यजित साळवे)
**संचालक, विद्यार्थी विकास**

**सोबत** :- 1) गुणतालिका 2) संख्या व कालावधी तालिका 3) महोत्सव प्रतिज्ञा 4) महोत्सव वेळापत्रक

## ♦ आंतर महाविद्यालयीन युवक महोत्सव युवारंग 2019-20 कलाप्रकार ♦
## प्रथम, द्वितीय व तृतीय विजेता साठी गुणतालीका

| कला प्रकार | प्रथम | द्वितीय | तृतीय |
|---|---|---|---|
| 1) **संगीत (Music)** | | | |
| अ) शास्त्रीय गायन | 5 | 3 | 2 |
| ब) शास्त्रीय वादन (तालवाद्य) | 5 | 3 | 2 |
| क) शास्त्रीय वादन (सुरवाद्य) | 5 | 3 | 2 |
| ड) सुगम गायन (भारतीय) | 5 | 3 | 2 |
| इ) सुगम गायन (पाश्चिमात्य) | 5 | 3 | 2 |
| फ) समुह गीत (भारतीय) | 7 | 5 | 3 |
| ग) समुह गीत (पाश्चिमात्य) | 7 | 5 | 3 |
| घ) लोक संगीत | 7 | 5 | 3 |
| च) भारतीय लोकगीत | 5 | 3 | 2 |
| 2) **नृत्य (Dance)** | | | |
| अ) समुह लोकनृत्य | 7 | 5 | 3 |
| ब) शास्त्रीय नृत्य | 5 | 3 | 2 |
| 3) **साहित्य कला (Literary)** | | | |
| अ) वक्तृत्व स्पर्धा | 5 | 3 | 2 |
| ब) वादविवाद स्पर्धा | 7 | 5 | 3 |
| क) काव्य वाचन स्पर्धा | 5 | 3 | 2 |
| 4) **नाटय कला (Theatre)** | | | |
| अ) विडंबन नाटय स्पर्धा | 7 | 5 | 3 |
| ब) मूक नाटय स्पर्धा | 7 | 5 | 3 |
| क) मिमिक्री | 5 | 3 | 2 |
| 5) **ललित कला (Fine Arts)** | | | |
| अ) रांगोळी स्पर्धा | 5 | 3 | 2 |
| ब) चित्रकला स्पर्धा | 5 | 3 | 2 |
| क) कोलाज | 5 | 3 | 2 |
| ड) व्यंगचित्र | 5 | 3 | 2 |
| इ) क्ले मॉडलींग | 5 | 3 | 2 |
| फ) स्पॉट पेन्टीग | 5 | 3 | 2 |
| ग) फोटोग्राफी | 5 | 3 | 2 |
| घ) इन्स्टॉलेशन | 7 | 5 | 3 |
| च) मेहंदी | 5 | 3 | 2 |

## ♦ आंतर महाविद्यालयीन युवक महोत्सव युवारंग 2019-20 ♦

### कला प्रकारातील स्पर्धक संख्या, साथीदार संख्या व स्पर्धेचा कालावधी (पूर्व तयारीसह) माहिती तालीका

| कला प्रकार | स्पर्धक संख्या | साथीदार संख्या | एकूण | स्पर्धा कालावधी |
|---|---|---|---|---|
| 1) **संगीत (Music)** | | | | |
| अ) शास्त्रीय गायन | 1 | 3 | 4 | 10 मि. |
| ब) शास्त्रीय वादन (तालवाद्य) | 1 | 2 | 3 | 8 मि. |
| क) शास्त्रीय वादन (सुरवाद्य) | 1 | 2 | 3 | 8 मि. |
| ड) सुगम गायन (भारतीय) | 1 | 2 | 3 | 5 मि. |
| इ) सुगम गायन (पाश्चिमात्य) | 1 | 2 | 3 | 5 मि. |
| फ) समुह गीत (भारतीय) | 6 | 3 | 9 | 8 मि. |
| ग) समुह गीत (पाश्चिमात्य) | 6 | 3 | 9 | 4 मि. |
| घ) लोक संगीत | 6 | 0 | 6 | 5 मि. |
| च) भारतीय लोकगीत | 1 | 3 | 4 | 5 मि. |
| 2) **नृत्य (Dance)** | | | | |
| अ) समुह लोकनृत्य | 8 | 3 | 11 | 8 मि. |
| ब) शास्त्रीय नृत्य | 1 | 3 | 4 | 8 मि. |
| 3) **साहित्य कला (Literary)** | | | | |
| अ) वक्तृत्व स्पर्धा | 1 | --- | 1 | 5 मि. |
| ब) वादविवाद स्पर्धा | 2 | --- | 2 | 5 मि. |
| क) काव्य वाचन स्पर्धा | 1 | --- | 1 | 4 मि. |
| 4) **नाट्य कला (Theatre)** | | | | |
| अ) विडंबन नाट्य स्पर्धा | 6 | 3 | 9 | 10 मि. |
| ब) मूक नाट्य स्पर्धा | 6 | 2 | 8 | 5 मि. |
| क) मिमिक्री | 1 | --- | 1 | 5 मि. |
| 5) **ललित कला (Fine Arts)** | | | | |
| अ) रांगोळी स्पर्धा | 1 | --- | 1 | 2.30 तास |
| ब) चित्रकला स्पर्धा | 1 | --- | 1 | 2.30 तास |
| क) कोलाज | 1 | --- | 1 | 2.30 तास |
| ड) व्यंगचित्र | 1 | --- | 1 | 2.30 तास |
| इ) क्ले मॉडलींग | 1 | --- | 1 | 2.30 तास |
| फ ) स्पॉट पेन्टीग | 1 | --- | 1 | 2.30 तास |
| ग ) फोटोग्राफी | 1 | --- | 1 | 2.30 तास |
| घ) इन्स्टॉलेशन | 4 | --- | 4 | 2.30 तास |
| च) मेंहदी | 1 | 1 | 2 | 2.30 तास |

# ♦ प्रतिज्ञा ♦

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील आम्ही सर्व विद्यार्थी विद्यार्थीनी या युवक महोत्सवामध्ये भारतीय कलेचा वारसा घेऊन स्वत:च्या कलागुणांचा विकास साधण्यासाठी सहभागी होत आहोत. आमचा सहभाग उत्कर्षमय, आनंदमय करण्यासाठी भारतीय परंपरेतील वैचारिक सामंजस्य व सहिष्णुता आम्ही आमच्या अंगी बाळगुन हा युवक महोत्सव आनंदमय करु. जाती धर्मा पलिकडील सामुहिक सहजीवन, दुर्बलांची जाण, वैचारिक अधिष्ठान, त्याग भावना व प्रसंगी न्याय भूमिकेसाठी संघर्ष करण्याची तयारी यातूनच राष्ट्र निर्माण होत असते. याची आम्हास जाणीव आहे. आमच्या उदात्त, उदार सांस्कृतिक परंपरेला साक्षी ठेवून बुध्दीनिष्ठ व विवेकनिष्ठ जीवन जगण्यासाठी कटीबध्द होणे हे आम्ही आमचे कर्तव्य समजतो. युवक महोत्सवातून उपरोक्त सर्व बाबी आमच्यामध्ये विकसीत व्हाव्यात यासाठी हा युवक महोत्सव संपूर्णत: शांततेत आणि आनंदात पूर्ण करण्याची आम्ही प्रतिज्ञा करीत आहोत.

जयहिंद जयहिंद जयहिंद

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

## विद्यापीठस्तरीय युवक महोत्सव युवारंग 2019-20 कालावधी दि. 16 ते 20 जानेवारी, 2020

### स्थळ - पू. सा. गु. वि. प्र. मंडळाचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय (विद्याश्रम परिसर), शहादा, जि. नंदुरबार

| दिनांक | वेळ | युवक महोत्सव युवारंग 2019-20 चे वेळापत्रक (Youth Festival 2019-20 Time Table) |
|---|---|---|
| 16/01/2020 गुरुवार | स.8.00 ते दु. 1.00 वा. | संघाचे आगमन व नोंदणी |
| | दु.2.00 ते 5.00 वा. | **सांस्कृतिक पथसंचलन** :- कृषि भवन ते मिशन बंगला, खेतिया रोड, शहादा |
| | संध्या 6.00 ते 7.00 वा. | रंगमंच क्र. 1 वर व्याख्यान |
| | रात्री 7.30 वा. | संघव्यवस्थापकांची सभा :- भारतरत्न डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम सभागृह (ICT Hall) (सर्व संघव्यवस्थापकांची सभा रोज 7.30 वा. होईल) |

| उद्घाटक प्रसिध्द शास्त्रज्ञ मा.डॉ.अनिल काकोडकर, माजी अध्यक्ष, अणु उर्जा आयोग (Vision-2020) | | **रंगमंच क्र. 1** आनंदयात्री पु.ल.देशपांडे रंगमंच | **रंगमंच क्र. 2** गायक सुधीर फडके रंगमंच (महात्मा गांधी सभागृह) | **रंगमंच क्र. 3** लोकशाहीर अण्णाभाऊ साठे रंगमंच (गुरुवर्य सी.डी.शहा सभागृह) | **रंगमंच क्र. 4** गीतकार ग.दि. माडगुळकर रंगमंच (सर विश्वेशरैय्या सभागृह) | **रंगमंच क्र. 5** लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल रंगमंच |
|---|---|---|---|---|---|---|
| 17/01/2020 शुक्रवार | स.9.00 वा. | मिमिक्री (Mimicry) | **उद्घाटन समारंभासाठी सर्वांनी रंगमंच क्र. 1 वर उपस्थित रहावे.** | | | |
| | दु. 2.00 वा. | विडंबननाट्य (Skits) | भारतीय लोकगीत (Indian Folk Song) | काव्यवाचन (Poetry) | शास्त्रीय वादन (सुरवाद्य) (Classcial Instrument- NP) | रांगोळी (Rangoli) |
| | | | भारतीय लोकगीत (Indian Folk Song) | काव्यवाचन (Poetry) | शास्त्रीय वादन (तालवाद्य) (Classcial Instrument- NP) | व्यंगचित्र (Cartooning) |
| 18/01/2020 शनिवार | स. 9.00 वा. | विडंबननाट्य (Skits) | सुगम गायन (पा.) (Light Vocal Solo) (W) | वादविवाद (Debate) | सुगम गायन (भारतीय) (Light Vocal Solo Indian) | कोलाज (Collage) |
| | स.11.30 वा. | मुकनाट्य (Mime) | समुहगीत (पा.) (Group Song) (W) | वादविवाद (Debate) | सुगम गायन (भारतीय) (Light Vocal Solo Indian) | क्ले मॉडेलिंग (Clay Modeling) |
| | दु.1.00 वा. | मुकनाट्य (Mime) | समुह गीत (भा.) (Group Song) (I) | | शास्त्रीयगायन (Classical Song) | स्पॉट पेंटींग (Spot Painting) |
| 19/01/2020 रविवार | स.9.00 वा. | समुह लोकनृत्य (Group Dance) | शास्त्रीय नृत्य (Classical Dance) | वक्तृत्व (Elocution) | फोटोग्राफी (प्र.फेरी) (Photography) | चित्रकला (Poster Making) |
| | दु.2.00 वा. | समुह लोकनृत्य (Group Dance) | लोकसंगीत (Folk Orchestra) | वक्तृत्व (Elocution) | फोटोग्राफी (अं.फेरी) (Photography) | इनस्टॉलेशन (Install.) <br> मेहंदी (Mehandi) |
| 20/01/2020 सोमवार | स. 10.00 वा. | **रंगमंच क्र. 1 :- पारितोषिक वितरण आणि समारोप सोहळा** | | | | |
| | | टिप - 1) दररोज स्पर्धा सकाळी 9.00 वाजता वेळापत्रकाप्रमाणेच सुरु होतील याची संघव्यवस्थापकांनी नोंद घ्यावी. <br> 2) दररोज दुपारच्या भोजनाची वेळ सकाळी 11.00 ते 1.00 व रात्रीच्या भोजनाची वेळ 6.00 ते 8.00 असेल <br> 3) रंगमंचावरील एक स्पर्धा संपल्यानंतर तात्काळ वेळापत्रकात दिल्याप्रमाणे त्या रंगमंचावरील दुसरी स्पर्धा सुरु करण्यात येईल. | | | | |

डॉ. एम.के.पटेल
**समन्वयक (पू.सा.गु.वि.प्र.मंडळाचे महाविद्यालय, शहादा)**

प्राचार्य,डॉ. आर.एस.पाटील
**संयोजक प्रमुख ((पू.सा.गु.वि.प्र.मंडळाचे महाविद्यालय, शहादा)**

डॉ. सत्यजित साळवे
**सचिव (संचालक,विद्यार्थी विकास)**

श्री. दिपक बंडू पाटील
**कार्याध्यक्ष, युवारंग 2019-20**

*D:\\VBOXSVR\xp_data\RMB\Yuvak Mahotsav 2019-2020.docx*

Shahada Taluka Educational Society & Co-Operative Educational Society Ltd.

# Institute of Management Research and Development

Shahada Dist- Nandurbar

**Dr. Jagdish J. Patil**
(M.Com.Ph.D.)
**Director**
Mo.9423435038

College Phone
02565-223122, 223532
**College Code: - 230102**

**Shri. Motilal F. Patil**
(M.Sc., Agri.)
**Chairman**

Website-www.stcimrd.ac.in

E-Mail:- stcoopimrdshahada@gmail.com

Date:-08-01-2019

## NOTICE

All the Teachers/students are here by informed that, **Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon and C.H.Chaudhari Arts, S.G.Patel Commerce & Babaji B.J.Patel Science College, Taloda** will be organizing the following program as per the given schedule.

We request the presence of all teachers and students for this important event. Your attendance is expected to be on time to ensure the smooth running of the program.

**Program Details**

Name of Program : - Yuvarang – 2018-19

Date : - 06-Feb-2019

Venue : - C.H.Chaudhari Arts, S.G.Patel Commerce & Babaji B.J.Patel Science College, Taloda

Director

DIRECTOR
S.T.E.S. & Co-Op Edu Society Ltd.
Institute of Management
Research & Development
Shahada, Dist. Nandurbar

|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

'A' Grade
NAAC Re-Accredited
(3rd Cycle)

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

## Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

(पूर्वीचे उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव)

**विद्यार्थी विकास व राष्ट्रीय सेवा योजना विभाग**

जा.क्र. कबाचौउमवि/14/युम-33/ 499 /2018 दि.13/12/2018

प्रति,
**मा. प्राचार्य/मा. संचालक/विभाग प्रमुख,**
विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालये, मान्यता प्राप्त परिसंस्था व विद्यापीठ शैक्षणिक प्रशाळा-विभाग यांना-

**विषय :- विभाग / जिल्हास्तरीय आंतर महाविद्यालयीन युवक महोत्सव 2018-19 ...**

महोदय/महोदया,

विद्यापीठ प्राधिकरण धोरणानुसार विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीबरोबरच त्यांच्या व्यक्तिगत सुप्त कला गुणांचा विकास व्हावा आणि कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ परिक्षेत्रातून प्रतिभावंत-कलावंत घडावेत यासाठी प्राथमिक स्तरावर विद्यार्थ्यांना व्यासपीठ मिळण्याकरीता विभाग / जिल्हा व विद्यापीठस्तरावर यावर्षापासून युवक महोत्सवाचे आयोजन करण्यात येत आहे.

या अनुषंगाने विद्यापीठ संलग्न महाविद्यालये, मान्यताप्राप्त परिसंस्था व शैक्षणिक प्रशाळा-विभागातील नियमित विद्यार्थ्यांसाठी विभाग / जिल्हा आंतर महाविद्यालयीन युवक महोत्सवाचे आयोजन विद्यार्थी विकास विभाग व आयोजक महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात येत आहे. शैक्षणिक वर्ष 2018-19 मधील विभाग / जिल्हास्तरीय आंतर महाविद्यालयीन युवक महोत्सवाचे ठिकाणी व कालावधी खालील प्रमाणे -

| अ.क्र. | विभाग / जिल्हा | दिनांक | स्थळ |
|---|---|---|---|
| 1 | **एरंडोल** (एरंडोल, जामनेर, पाचोरा, भडगाव, चाळीसगाव, पारोळा, अमळनेर, चोपडा, धरणगाव) | शनिवार, दि.5 जानेवारी, 2019 | बी. पी. कला, एसएमए विज्ञान व केकेसी वाणिज्य महाविद्यालय, चाळीसगाव |
| 2 | **जळगाव** (जळगाव, भुसावळ, रावेर, यावल, मुक्ताईनगर, बोदवड) | सोमवार, दि.7 जानेवारी, 2019 | जी. एच. रायसोनी इन्स्टिट्युट ऑफ बिझीनेस मॅनेजमेंट, जळगाव |
| 3 | **धुळे** | बुधवार, दि.9 जानेवारी, 2019 | श्रीमती एन. एन. चौधरी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, कुसुंबा, जि.धुळे |
| 4 | **नंदुरबार** | शुक्रवार, दि.11 जानेवारी, 2019 | चं.ह.चौधरी कला, शं.गो.पटेल वाणिज्य व कै.बाबाजी भ.जा.पटेल विज्ञान महाविद्यालय, तळोदा, जि.नंदुरबार |

आपणास विनंती करण्यात येते की, विभाग / जिल्हास्तरीय आंतर महाविद्यालयीन युवक महोत्सवामध्ये विविध कला प्रकारात आपले विद्यार्थी जास्तीत-जास्त संख्येने सहभागी होण्याकरीता प्रयत्न करावेत. युवक महोत्सवात सहभागी होणाऱ्या स्पर्धकांना व कला मंडळाच्या प्रमुखांना या परिपत्रकासोबत दिलेली स्पर्धा नियमावली व माहिती निर्देशनास आणून द्यावी. आपल्या तज्ञ प्राध्यापकांच्या सहकार्याने स्पर्धकांची चांगली तयारी करुन स्पर्धेतील विविध कला प्रकारांमध्ये आपला संघ **सहभागी होणे अनिवार्य आहे.**

विभाग / जिल्हास्तरीय युवक महोत्सव नियमावली व माहितीपत्रकासंदर्भातील विद्यापीठ व आयोजक महाविद्यालयाचे समन्वयक, संपर्क क्र., ईमेल व संकेत स्थळ इ. पुढीलप्रमाणे -

**Online प्रवेशिका सादर करण्याचा कालावधी दि.14 ते 26 डिसेंबर, 2018**

| समन्वयक | संपर्क क्र. व ईमेल | संकेतस्थळ | Hard copy स्वीकृती |
|---|---|---|---|
| डॉ.पंकजकुमार नन्नवरे | 9423904872 drpankajnannavare@gmail.com | www.cescollege.org | 03/1/2019 |
| प्रा.राजकुमार अशोक कांकरिया | 8411826543, 9011768391 rajkumar.kankriya@raisoni.net | www.ghribmjal.raisoni.net | 05/1/2019 |
| प्रा.सिध्दार्थ भास्कर सोनवणे | 9960055517 siddharth.sonawane2@gmail.com | www.smtnncckusumba.org.in | 07/1/2019 |
| डॉ.एस.एन.शर्मा | 9422564427 drsnsharma774@gmail.com | www.acsc-taloda.org | 09/1/2019 |

युवक महोत्सव नियमावली व माहितीपत्रकासंदर्भात **विद्यापीठाच्या** वेबसाईटवर भेट द्यावी. विद्यापीठाच्या वेबसाईटवरील कॉलेज लॉगीन मध्ये **युवारंग लिंक दि. 14 ते 26 डिसेंबर, 2018** दरम्यान उपलब्ध असून यात स्पर्धक, साथसंगीतदार आणि संघ व्यवस्थापक यांची माहिती भरणे अनिवार्य आहे. तसेच विविध शुल्क, नोंदणी, प्रवेश, भोजन आदि ई-पेमेंट (NEFT) द्वारे आयोजकांच्या बँक खाती जमा करावेत, सदर बँक खात्याचा तपशिल पेज क्र.11 वर नमुद आहे.

नोंदणी झाल्यावर महाविद्यालयाचे विविध रिपोर्ट तयार होतील. त्या रिपोर्टवर संबधित, विद्यार्थी विकास अधिकारी व मा.प्राचार्य / संचालक / विभागप्रमुख यांनी स्वाक्षरी करुन scan copy आयोजकांकडे पत्रकात दर्शविल्याप्रमाणे पाठवावी. त्यासोबत NEFT ची प्रत देखील पाठवावी. सर्व कागदपत्र व प्रपत्राच्या soft copy, hard copy तसेच ई-पेमेंटची प्रत पत्रकात नमूद कालावधीमध्ये आपल्या प्रतिनिधींमार्फत आयोजकाकडे सादर करावे. विद्यार्थी व संघ व्यवस्थापक यांचा नजीकच्या काळातील एक फोटो अर्जावर चिटकवून व एक फोटो त्यांच्या अर्जासोबत स्वतंत्रपणे स्टेपल करुन (फोटोच्या मागे मार्करने नाव लिहून) सादर करावे. तसेच सर्व रिपोर्ट व ई-पेमेंट केल्याची एक प्रत संघ व्यवस्थापकांनी सोबत ठेवणे आवश्यक आहे.

कळावे,

आपला विश्वासू,

(प्रा. सो. तु. इंगळे)
**प्र.संचालक, विद्यार्थी विकास**

**सोबत :-** सूचना, नियमावली व माहितीपत्रक

**प्रत माहितीसाठी -**

1) मा.कुलगुरु कार्यालय, कबचौउमवि, जळगाव
2) मा.प्र-कुलगुरु कार्यालय, कबचौउमवि, जळगाव
3) मा.कुलसचिव, कार्यालय, कबचौउमवि, जळगाव
4) मा.वित्त व लेखा अधिकारी, कबचौउमवि, जळगाव
5) मा. विभागप्रमुख, उत्तमविद्या अंक, जनसंवाद व पत्रकारीता विभाग, कबचौउमवि, जळगाव
6) मा. जनसंपर्क अधिकारी, कबचौउमवि, जळगाव - कृपया वृत्तपत्रात प्रसिध्दी दयावी.
7) मा.पध्दती विश्लेषक संगणक केंद्र, संगणक प्रशाळा, कबचौउमवि, जळगाव - कृपया पत्रकास विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्दी दयावी.

**टिप:- नोंदणी करण्यास अडचण आल्यास कृपया 9423185079 यानंबरवर कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा.**

*D:\\VBOXSVR\xp_data\RMB\Yuvak Mahotsav Paripatrak 2018-19.docx*

## ♦ विभाग / जिल्हास्तरीय आंतर महाविद्यालयीन युवक महोत्सव ♦

*** महाविद्यालय, परिसंस्था व शैक्षणिक प्रशाळा-विभाग यांना महत्वाच्या सूचना :-**

1) प्रत्येक महाविद्यालयाच्या संघा सोबत दोन **पूर्ण वेळ मान्यताप्राप्त** संघ व्यवस्थापक संपूर्ण युवक महोत्सव कालावधीसाठी पाठवावे, त्यामध्ये 1 पुरुष व 1 महिला असणे आवश्यक आहे. (स्पर्धक संख्या 30 किंवा त्यापेक्षा जास्त असल्यास 3 संघ व्यवस्थापक पाठवू शकतात, तासिका तत्वावरील किंवा कंत्राटी शिक्षक संघ व्यवस्थापक म्हणून पाठवू नये.) त्यांनी महाविद्यालयाचे ओळखपत्र बाळगणे आवश्यक राहील.
2) संघ व्यवस्थापकांची सभा महोत्सवाच्या आदल्या दिवशी दुपारी 4.00 वाजता कार्यक्रम स्थळी घेण्यात येईल. सभेस किमान एक संघ व्यवस्थापक उपस्थित राहाणे आवश्यक आहे. सभेत कलाप्रकार निहाय स्पर्धा क्रमवारी (लॉटस) निश्चित करण्यात येतील.
3) संघ व्यवस्थापकांनी संघासोबत थांबणे सक्तीचे आहे व त्यांनी आपआपल्या विद्यार्थ्यांसोबत परिसरात जास्तीत-जास्त काळ थांबावे.
4) कोणत्याही कला प्रकारासाठी वादन साहित्य, इतर साहित्य, स्पर्धक संघाने स्वत: आणावयाचे आहे.
5) महोत्सवात सहभागी होणाऱ्या संघाची कला प्रकार निहाय नोंदणी परिपत्रकात नमूद केल्याप्रमाणे करावी. उशिरा आलेल्या संघाची नोंदणी करण्यात येणार नाही, याची संघ व्यवस्थापकांनी नोंद घ्यावी.
6) युवक महोत्सवासाठी विद्यार्थी निवड करतांना सदरचा विद्यार्थी पदवी / पदवीव्युत्तर वर्गात नियमित प्रवेश घेणारा असावा. **पदविका व सहामाही / एक वर्षाच्या प्रमाणपत्र अभ्यासक्रमाला प्रवेशित विद्यार्थ्यांची निवड करु नये.** त्यांचेकडे शैक्षणिक वर्ष 2018-19 मधील ओळखपत्र असावे त्यावर मा.प्राचार्य/ संचालक/ विभागप्रमुख/ ग्रंथपाल याची स्वाक्षरी असावी.
7) युवक महोत्सवासाठी निवड झालेला विद्यार्थी हा नियमित प्रवेशीत, ओळखपत्रधारक, वय, वयोमर्यादा व त्याची शैक्षणिक अर्हता याबाबत खात्री करुन पात्र विद्यार्थी युवक महोत्सवा मध्ये पाठविण्याची जबाबदारी संघव्यवस्थापक, विद्यार्थी विकास अधिकारी, प्राचार्य/ संचालक/ विभागप्रमुख यांची राहील. याबाबत अनियमितता आढळल्यास मा. कुलगुरु महोदय, मा.विद्यापीठ व्यवस्थापन परिषद व विद्यापीठ विकास मंडळ यांच्या निर्णयानुसार कार्यवाही करण्यात येईल.
8) कार्यक्रम स्थळी विद्यार्थ्यांनी कोणतेही लिखाण, तोडफोड अथवा घाण करु नये, अशी ताकीद संघ व्यवस्थापकांनी विद्यार्थ्यांना द्यावी. पालन न झाल्यास योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.
9) संघ व्यवस्थापकांनी कोणत्याही कारणाने परीक्षकांना भेटू नये. तसेच स्पर्धकांसोबत थांबणे आवश्यक आहे. संघ व्यवस्थापकांनी स्पर्धकास नातेवाईक अथवा मित्र यांच्याकडे जाण्यास परवानगी देऊ नये.
10) स्पर्धक महाविद्यालयास निश्चित केलेल्या क्रमवारीनुसार सादरीकरण करणे बंधनकारक राहील.
11) संघ व्यवस्थापकांच्या सभेत वक्तृत्व व वादविवाद स्पर्धांचे विषय जाहीर केले जातील.
12) परीक्षकांचा निर्णय अंतिम राहील व तो सर्वांवर बंधनकारक राहील.
13) **कला प्रकार सादरीकरणामध्ये अश्लिल शब्दाचा वापर करु नये.** अन्यथा त्या कला प्रकाराचे सादरीकरण त्याच क्षणी रद्द करण्याचा अधिकार परीक्षकांना आहे.
14) संघ व्यवस्थापकांनी आपल्या महाविद्यालयाचे काही लेटर हेड सोबत ठेवावे. कोणतीही तक्रार लेटर हेड शिवाय स्वीकारली जाणार नाही.
15) सामुहिक कला प्रकारात संघ मुलांचा अथवा मुलींचा अथवा मुलांमुलींचा असला तरी चालेल.
16) **कोणत्याही स्पर्धकाचे वय दि.1 जुलै, 2018 रोजी 25 वर्षा पेक्षा जास्त नसावे** याची पडताळणी केल्यावरच स्पर्धकाला महोत्सवात पाठवावे.
17) **एका स्पर्धकास जास्तीत-जास्त तीन (3) उपकला प्रकारात सहभागी होता येईल व ललित कला प्रकारातील स्पर्धेत जास्तीत जास्त दोन (2) उपकलाप्रकारात सहभाग घेता येईल.** यापेक्षा जास्तीचा सहभाग आढळून आल्यास त्याचा सर्व कला प्रकारातील सहभाग रद्द करण्यात येईल.
18) महोत्सव संबंधी कोणताही निर्णय घेण्याचा, कार्यक्रमात बदल करण्याचा अधिकार युवक महोत्सव व्यवस्थापन समितीने राखून ठेवला आहे.
19) स्पर्धकाच्या प्रवेश अर्जावरील छायाचित्र तसेच जन्म तारखेचा दाखला (L.C./T.C.) मा. प्राचार्य/ संचालक / विभाग प्रमुख यांनी साक्षांकीत केलेले असावे. नसल्यास सदर विद्यार्थ्याचा त्या कला प्रकारातील सहभाग रद्द करण्यात येईल.

20) पार्श्वसंगीतासाठी व्यावसायिक संगीत साथीदारांना परवानगी राहील. त्याकरीता प्रवेशिकेत नमूद करणे आवश्यक राहील.

21) अ) युवक महोत्सवात प्रत्येक महाविद्यालयाने आपला सहभाग नोंदवावा विद्यापीठ संलग्न प्रत्येक महाविद्यालयाने युवक महोत्सव शुल्क रु. 600/- NEFT द्वारे यजमानांकडे जमा करणे आवश्यक आहे.
ब) सहभागी महाविद्यालयांकडून प्रत्येक विद्यार्थ्याकरीता रु. 40/- प्रवेश शुल्क NEFT द्वारे यजमानांकडे जमा करावे.

22) **प्रत्येक महाविद्यालयाने युवक महोत्सवात सहभागी होणे अनिवार्य आहे. (पाच मुख्य कलाप्रकारातील किमान एका उपकला प्रकारात सहभागी होणे बंधनकारक आहे.) ज्या महाविद्यालयाचा युवक महोत्सवात सहभाग नसेल त्यांच्यावर प्राधिकरणाच्या निर्णयानुसार कडक कारवाई करण्यात येईल, याची महाविद्यालयांनी नोंद घ्यावी.**

23) एका महाविद्यालयाच्या संघात जास्तीत-जास्त 42 स्पर्धक विद्यार्थी, 2 संघव्यवस्थापक व 6 संगीत साथीदार किंवा सहकारी असे एकूण जास्तीत-जास्त 50 व्यक्ती सहभागी असतील.

24) आयोजक महाविद्यालयाने स्पर्धक, संघ व्यवस्थापक व साथ-संगीतदार यांची भोजन, चहा व नास्ता याची व्यवस्था केली असून या व्यवस्थेकरीता प्रती व्यक्ती रु.150/- शुल्क आकारण्यात येईल, सदर शुल्क NEFT द्वारे यजमानांकडे जमा करावे.

